अश्रुढाळीतेव्हांनयनीं ॥ स्तब्धझालासेतयेक्षणीं ॥ शब्दनफुटेबोलावया ॥ ८४ ॥ धुमासूराचेंऐकतांवचन ॥ धूमकेतुआणिधुम्रवर्ण ॥ प्रधा
नादिकसभाजन ॥ स्तब्धझालेतेकाळीं ॥ ८५ ॥ वदेतेव्हांदशकंदर ॥ रायानसोडीआतांधीर ॥ घडोंनयेतोविचार ॥ घडलाअसेदैवयोगें ॥
॥ ८६ ॥ विचारचुकलातेचवेळीं ॥ तेणेंचउत्पन्नहीझालीकळी ॥ आतांकरोनीहातोफळी ॥ वैरद्विगुणीतनवाढवावें ॥ ८७ ॥ तरीयाचाआतां
विचारकरुन ॥ करावेंरायाआत्मरक्षण ॥ जेणेंउभयांचेंहोयकल्याण ॥ ऐसासुविचारकरावा ॥ ८८ ॥ जेणेंमागीलदुःखातेंविसरती ॥ ऐसीअसे
एकयासयुक्ती ॥ यावांचोनियानिश्चिती ॥ कार्यनसाधेंकदापी ॥ ८९ ॥ माधवआणिसुमदेस ॥ जावोनीबोधावेंउभयांस ॥ तुझियापुत्रहस्तें
आह्मांस ॥ मृत्युसाचअसेहा ॥ ९० ॥ झालीअसेआकाशवाणी ॥ तीहीत्वाऐकिलीकर्णीं ॥ याचाविचारमनींकरोनी ॥ कल्याणकरींउभयांचें॥
॥ ९१ ॥ असत्यनोहेंतीटाळीतांनी ॥ तरीमानदेईमाझियावचनीं ॥ यानेंउभयांचेंरक्षणहोउनी ॥ सुखहोईलसर्वांसी ॥ ९२ ॥ प्रथमतुह्मांसीजो
होईलसुत ॥ तोद्यावातुंआह्मांसीसत्य ॥ आह्मीतयाचाकरूंअंत ॥ आत्मरक्षणालागोनी ॥९३॥ ऐसेत्रयपुत्रदेईआह्मांसी ॥ पुढेंहोतीलजेकांतु
जसी ॥ करुंतयांच्यारक्षणासी ॥ निश्चयेसीजाणहें ॥९४॥ आणिकरोनितयांसीबंदमुक्त ॥ द्यावेंतयानास्वातंत्र ॥ करितांऐसेंनिश्चित ॥ मागी
लदुःखविसरवी ॥ ९५ ॥ जरीवचननमानितीबोधितां ॥ मगदोषनलागेहानीकरितां ॥ तवपुरुपार्थवर्णोनीतत्वतां ॥ कार्यसाधावेंयुक्तीनें॥९६॥

तयानींहीगोष्टकरितांमान्य ॥ यानेंउभयांचेंहीकल्याण ॥ याबांचोनीरायाउपायअन्य ॥ दुजानसेसर्वथा ॥ ९७ ॥ वदताऐसेंदशकंदर ॥ सर्वां
सीमानवलाहाविचार ॥ वदेतयासीधुमासूर ॥ समीपताबाहोनी ॥ ९८ ॥ तूंजोसद्विचारवदलासी ॥ तेणेंआनंदझालाबहुमानसीं ॥ तरितुंचि
जावोनीउभयांसी ॥ बोधकरीनम्रत्वें ॥ ९९ ॥ उभयतांयेथेंयेतीलजरी ॥ घेऊनयेगात्यांसत्वरी ॥ किंवातेतेथेंचीरहातीलतरी ॥ तयासीगुप्तरक्ष
णठेवावें ॥ १०० ॥ जेव्हातयासीहोईलसुत ॥ त्याचवेळींघ्यावात्वरित ॥ तयाचाआह्मींकरूंअंत ॥ आत्मरक्षणकरावया ॥ १ ॥ दशवदनातेंऐ
सेंकथोनी ॥ धाडीलावेगेंस्थावरभुवनीं ॥ इकडेस्थावरींकायझालीकरणी ॥ तिश्रोतींआतांपरिसावी ॥ २ ॥ पराभवोनीप्रधानास ॥ गुप्तझाले
विघ्नपुरुष ॥ हेंलक्षितांसुमदेस ॥ आनंदचित्तींदाटला ॥ ३ ॥ माधवहोऊनीजागृत ॥ चहुंकडेतेव्हांविलोकीत ॥ भयानकअरण्यदिसत ॥ ते
व्हांचकितझालामामसीं ॥ ४ ॥ सुमदात्वरेंउठोनियां ॥ नमितांप्रेमेंपतिच्यापायां ॥ शक्तिनसेउठावया ॥ अश्रुनयनींलोटले ॥ ५ ॥ सुमदेचा
तेव्हांधरोनीहस्त ॥ आपणासमीपबैसवीत ॥ तेव्हांस्फुंदस्फुंदानीसांगत ॥ वृत्तसमस्ततेकाळीं ॥ १६ ॥ कथितांसकळसमाचार ॥ माधवझाला
चिंतातुर ॥ ह्मणेसमर्थासीपडिलेंवैर ॥ उपाययासीनसेचकीं ॥ १०७ ॥ महान्पराक्रमीधुमासूर ॥ समरींजिंकीलेंहरीहर ॥ जरीतयासीकरितांस
मर ॥ यशनयेचीकालत्रयीं ॥ १०८ ॥ वदतांऐसेंतयेक्षणीं ॥ विचारनसुचेचीकांहींमनीं ॥ हेंजाणोनीकौंडण्यमुनी ॥ सन्मुखतेव्हांप्रगटला ॥
॥ १०९ ॥ लक्षोनियायोगेश्वर ॥ उभयांसीआनंदझालाथोर ॥ दंडसेनमोनीचरणांवर ॥ हस्तजोडोनीप्रार्थिती ॥ १० ॥ जयज
याजीयोगेश्वरा ॥ दयासागराकरूणाकरा ॥ रक्षींदीनासीउदारा ॥ शरणआलोंसद्भावें ॥ ११ ॥ रायाचेसुशब्दऐकतांकानीं ॥ शांतवितसे
तयांसीमुनी ॥ ह्मणेचिंतानकरीआतांमनीं ॥ करीलरक्षणगजमुख ॥ १२ ॥ उभयतांतुह्मींलक्ष्मीनारायण ॥ अंशेंआवतारघेतलाजाण ॥ त्याप्रमा
णेंहीवर्तन ॥ केलेंपाहिजेयेकाळीं ॥ १३ ॥ मायाप्रभुचीहीअनिवार ॥ त्यांतगुंतलेंहेंचराचर ॥ तरितुझाहीहरीहाअवतार ॥ गणेशप्राप्तीलागुनी ॥
१४ समजावोनिऐसेंउभयांप्रती ॥ आणिलेंद्वयांसीगणेशातिर्थी ॥ स्नानघालोनीतयांप्रती ॥ एकाक्षरीमंत्रउपदेसीला १५मस्तकींतयांच्याठेवोनीह
स्त ॥ आनंदेंमुनीतयासीवदत ॥ दुर्वांकुरेंआर्चीतांएकदंत ॥ पावेलमनोगतसर्वहीं ॥ १६ ॥ तेव्हांनिजाश्रमीआणून ॥ भोजनीआर्पिलेंशद्र
सान्न ॥ क्षेत्राचेंउत्तरस्थानलक्षुन ॥ आश्रमकरूनीदिधला ॥ १७ ॥ मुनीवदेउभयांसी ॥ अखंडस्मरागजाननासी ॥ पावालतुह्मीससुखासी
नामप्रतापेंकरोनीं।१८त्यागूंनकाहेंकदांस्थान॥पुत्रहोईलगजानन॥अनंतलीलाकरून॥दानवकंदनकरील१९कौंडण्येंउभयांसीसंबोखोनी।स्वाश्रमीं
येतसेतयेक्षणीं॥क्षणेक्षणींयेवोनी॥भेटदेतसेनित्यकाळीं २० उभयतांअखंडआनंदीत॥नामस्मरणीसदारत॥झालीतेणेंचिंतारहित॥नामयोगेंतेंका

ळीं ॥ २१ ॥ त्रिकाळज्ञानीमुनीश्वर ॥ कळलासकळसमाचार ॥ येवोनियाअतीसत्वर ॥ गुह्यसांगतउभयांसी ॥ २२ ॥ बोधावयादशकंदर ॥
आतांचीयेईलनिरधार ॥ मानातयाचासुविचार ॥ संशयमनींनधरीता ॥ २३ ॥ मागेलयेवोनीतुह्मांसीसुत ॥ अत्मरक्षणार्थनिश्चित ॥ तरीम
मवचनमानोनीसत्य ॥ देऊंवदातयासी ॥ २४ ॥ होईलपुत्रगजानन ॥ दानवांचेंकरावयाहनन ॥ तयासीनसेंजन्ममरण ॥ कोणमारीतातया
सी ॥ २५ ॥ दानवएकएकमर्दोनी ॥ तुह्मांसीभेटेलमागुतेनी ॥ परिहेंस्थानसोडोनी ॥ प्रार्थिताकदानजावें ॥ २६ ॥ मुनीचेसुशब्दऐकतां
कानीं ॥ माधवचित्तींआनंदोनी ॥ पाणीद्वयजोडोनी ॥ वदेनमोनीपदासीं ॥ २७ ॥ सद्गुरुधन्यतुंदयावंत ॥ पूर्णकरसीआमुचाहेत ॥ क्षणोक्ष
णींयेवोनत्वरीत॥ कारसीरक्षणस्वामीया ।२८। पदींतुझ्याठेवितांभाव ॥रंकाचाहीकरसीलराव॥ कृपेनेंदेसीलआत्मवैभव ॥ अनन्यभावेंतुजस्मरतां
२९ मुनीनेंतेव्हांधरोनीकरी ॥ समजावोनियानानापरी ॥ निजआश्रमागेलासत्वरी ॥ बोधकरोनीउभयांसीं ॥१३०॥ सुमदामाधवहर्षभरीत ॥
मनींस्मरतीएकदंत ॥ दुर्वांकुरेंअर्चितीप्रेमयुक्त ॥ चिंतामणीसीनित्यकाळीं ॥ ३१ ॥ जेवीमातारक्षींनिजबालकासी ॥ तेवीरक्षींनिजभक्तांसी ॥
आनंदवाटेंचीत्तासी ॥ चिंतामणीच्यादर्शनें ॥ ३२ ॥ तेचदिवशींदशकंदर ॥ पातलाघेऊनीदैत्यभार ॥ माधवेंतयासीदेखतांदुर ॥ चिंतातुर
जाहला ॥ ३३ ॥ रावणएकटापुढेंयेऊनी ॥ माधवासीभेटलाआनंदानी ॥ तेव्हांसुमदेसीप्रार्थोनी ॥ नमोनीबोलताजाहला ॥ ३४ ॥ गोष्टजी
घडूंनयेतीअसेघडली ॥ तीआतांमनांतआणीकदाकाळीं ॥ दैवेंरक्षिलेंसेयेवेळीं ॥ उभयांलागींनिश्चयें ॥ ३५ ॥ कर्मकेलेंहेंअनुचितफार॥ मनीं
आठवोनीघुमासूर ॥ यानेंरात्रंदिनचिंतातुर ॥ चैननपडेतयासी ॥ ३६ ॥ त्यांतोनीअनुचीतकर्महेंकरणयास ॥ उपाययोग्यहाअसेत्यास ॥
करावयाआत्मरक्षणास ॥ याविणअन्यउपायनसेची ॥ ३७ ॥ तवसुतहस्तेंत्रिवर्गांसी ॥ मृत्युअसेहानिश्चयेंसी ॥ हेंसत्यजाणनिजमानसीं ॥
दुःखकारकगोष्टही ॥ ३८ ॥ झालीअसेजीआकाशवाणी ॥ तीतूंश्रवणकेलीसकर्णीं ॥ तीअसत्यनहोयटाळीतानी ॥ सत्यमानसींजाणहें ॥
॥ १३९ ॥ तरीतारीतूंदोन्हींकुळांस ॥ घेईपदरींनिर्दोषयश ॥ चिरकाळभोगीससुखास ॥ यास्तवयासीविचारसांगतों ॥ १४० ॥
त्यागोनीसर्वअखीलमाया॥ यासुवचनींमानदेईराया ॥ कल्याणघेईंकरोनिया ॥ वैरभावनात्यजोनी ॥ ४१ ॥ जोपुत्रहोईलतुजलागो
नी ॥ त्रयपुत्रऐसेआह्मांदेवोनी ॥ तयांचावधआह्मीकरोनी ॥ रक्षुंआत्मजिवीतातें ॥ १४२ ॥ पुढेंजेहोतीलतुजलासुत ॥ त
यासीरक्षुंजाणसत्य ॥ त्रयसुतांवाचोनीनिश्चित ॥ आह्मांप्रतीपुढेंनद्यावा ॥ ४३॥ स्वराजमीतयाअर्पीन ॥ गळ्याचीसत्यतुझ्यावाहातोंआण ॥
असत्यनवदेंगेलीयाप्राण ॥ तववातहेंस्वयेंवदलासे ॥ ४४ ॥ रुचेलजैसेंतुजलामनीं ॥ राहीसुखेंतयास्थानीं ॥ जरीयेणेंअसेलममसदनीं ॥ किं

घास्वराज्यासजाईकां ॥ ४५ ॥ तरीरायाहेंमानीवचन ॥ यानेंउभयपक्षींहोयकल्याण ॥ जरीह्मावचनींनदेतांमान ॥ अनर्थदारुणहोईल ॥४६॥
घुमासूरह्मामहाबळी ॥ माजवीलसमरींहातोफळी ॥नाशहोईलउभयकुळीं॥ विचारकरीयागोष्टींचा ४७ रावणाचीऐकतांवाणी ॥ माधववदेतयेक्षणीं॥
तुझेंवचनमजलागुनी ॥ मान्यअसेंसर्वस्वें॥४८॥ तरीमाझीयेमनींचामनोगत ॥ तोपूर्णकरावातयानीसत्य॥ आह्मीअखंडराहूंयेथ ॥ मायापुरीस
नयेऊं॥४९॥ सुखेंकरूंयेथेंवास ॥ नेमेंपुत्रहेदेऊंत्यास ॥ द्वेषेंनशीणवावेंआह्मांस ॥ पुत्रअर्पितांतुह्मांसी ॥५०॥ देतांआह्मींतुह्मांसीसुत ॥ समक्षन
करावापूर्णहेत ॥ हेंवचननत्यागीतांनिश्चित ॥ मनोरथपूर्णनकरावा ॥ ५१ ॥ माधवाचेंऐकतांवचन ॥ आनंदीतझालादशवदन ॥ माधवसु
मदेसीपुसोन ॥ गुप्तरक्षकठेवोनीनिघाला ॥ ५२ ॥ मायापुरीसयेऊनी ॥ घुमासूरासींभेटलासभास्थानीं ॥ वृत्तसर्वसांगेंआनंदानी ॥ सभाज
नसर्वऐकती ॥ ५३ ॥ कथितांमीतववचनासी ॥ माधवेंमानदिधलात्यासी ॥ आनंदझालासुमदेसी ॥ तवशब्दकानींऐकतां ॥ ५४ ॥ परीमा
घवएकवदलावचन ॥ आह्मींनत्यागूंहेंकदास्थान ॥ सुततुह्मींजाघेऊन ॥ हेतुपूर्णकरावया ॥ ५५ ॥ सुतअर्पितांआह्मींतुह्मांस ॥ दूरनेवोनिया
तयास ॥ पूर्णकरावेंमनोरथास ॥ समक्षगोष्टनकरावी ॥ ५६ ॥ ऐकोनीसुशब्दहेघुमासूर ॥ आनंदीतमनींझालाफार ॥ ह्मणेहेंकार्यसाधिलेंथोर
॥ चुकलाअनर्थसर्वांचा ॥ ५७ ॥ इकडेमाधवसुमदाहर्षभरित ॥ भावेंकरतीसंकष्टीव्रत ॥ चंद्रोदयींएकदंत ॥ आनंदेंकरोनीअर्चिती ॥ ५८ ॥
गणेशतिर्थिकरुनस्नान॥ नित्यकरतीदुर्वार्पण ॥ मुखींसदानामस्मरण ॥ चिंतात्यागोनीसर्वही५९॥ लोटतांऐसेकांहींदिवस ॥ येताउत्तममाघमा
स ॥ त्यामाजीकृष्णचतुर्थीस ॥ भौमवासरत्यादीनीं ॥ १६० ॥ उभयांनींकरोनीनिरसन ॥ चंद्रोदयातेंलक्षुन ॥ भावेंकरतीगणेशपुजन ॥ शोड
शोपचारेंकरोनी ॥ ६१ ॥ घेवोनियादुर्वांकुर ॥ सद्भावेंअर्पितीमस्तकावर ॥ मोदकनैवेद्यअतीसुरस ॥ अर्पणकरीतीआनंदें ॥६२॥ दृष्टींलक्षुन
चिंतामणी ॥ स्तुतिकरतीहस्तजोडोनी ॥ स्थापोनियाहृदयभुवनीं ॥ निमग्नझालेस्वरूपांत ॥ ६३ ॥ जाणोनीद्वयांचीसदृढभक्ती ॥ आनंदो
नियामंगलमूर्ती ॥ प्रगटझालाश्रीगणपती ॥ उभयांसन्मुखतेकाळीं ॥ ६४ ॥ सरळशुंडालंबायमान ॥ कीरिटकुंडलेंशूर्पकर्ण ॥ एकदंतभाळींनिशा
रमण ॥ चतुर्बाहुविराजती ॥ ६५ ॥ शेंदुरचर्चितरक्तवर्ण ॥ प्रगटोनीऐसागजानन ॥ वदताझालाप्रेमेंकरून ॥ माधवसुमदेसीतेकाळीं ॥६६॥ पूर्ण
करावयातुमचाहेत ॥ झालोंआनंदेंआतांसुत ॥ विलोकुनींघ्यामातेंत्वरित ॥ चिंतामानसीनकरीतां ॥ ६७ ॥ सुशब्दहेदीव्यउभयकानी ॥ जावो
नीबिंबतांतयेक्षणीं ॥ लक्षितांनेत्रउघडोनी ॥ चिंतामणीदोखिला ॥ ६८ ॥ सुमदामाधवतयेक्षणी ॥ सद्भावेंलागलेतेव्हांचरणीं ॥ उभेसन्मुखराहु
नी ॥ स्तुतिकरतीआनंदे।६९। जयजयाजीलंबोदरा ॥ विश्वपाळकासर्वेश्वरा ॥ स्वानंदवासीयाविघ्नहरा ॥ दयासागरागजानना १७० करितां

तुझेंनामस्मरण ॥ तत्काळचुकेंभवबंधन ॥ निर्विकल्पतूंनिरंजन ॥ सगुणनिर्गुणमुक्तझालासी ॥ ७१ ॥ सुमदातेव्हांआनंदोनी ॥ सद्भावेंनेमानी
चिंतामणी ॥ वदतीझालीदीनवाणी ॥ हस्तजोडोनीतयासी ॥ ७२ ॥ अष्टवर्षांचामातेंसुत ॥ केवींशोभसीलतूंएकदंत ॥ जनउपहासकरतील
समस्त ॥ कधींपुत्रइजलाजाहला ॥ ७३ ॥ हाशब्दसर्वंटाळोनी ॥ सनाळबाळहोतुंचिंतामणी ॥ ऐसीआसमाझीयेक्षणीं ॥ पुर्णकरीहीदयाळा ॥
॥ ७४ ॥ सुमदानंदनवदतीजन ॥ ऐसेंलघुरुपदेवाधरुन ॥ होईआतांममनंदन ॥ करीआसहीपुर्णमाझी ॥ ७५ ॥ वचनसतीचेंऐकोनीकानीं ॥
आनंदोनियाचिंतामणी ॥ सनाळबाळकतयेक्षणीं ॥ सुमदेपुढेंजाहला ॥ ७६ ॥ अद्भुतअसेजयाचीमाया ॥ जीब्रह्मादीकांसीनयेआया ॥ ती
नेंउभयांसीमोहोनियां ॥ लघुरुपधरिलेंसे ॥ ७७ ॥ सुमदामाधवआनंदानी ॥ देवासन्मुखउभींअसुनी ॥ स्वाश्रमींबालकदेखतीनयनीं ॥ आनं
दीतझालींतेधवां ॥ ७८ ॥ तेव्हांआश्रयापातलीसेसत्वर ॥ नयनींलक्षिलालंबोदर ॥ तेव्हांयेतीत्वरेंमुनीचेभार ॥ चिंतामणीसीपहावया॥७९॥
बालककरितांरुदन ॥ सुमदाघेतसेउचलुन ॥ सुरगणआनंदेंगगनांतून ॥ सुमनवृष्टीकारिताती ॥ १८० ॥ झालाएकचीजयजयकार ॥ दर्शन
घेतीयोगेश्वर ॥ तेव्हांमधुबिंदुघेऊनिसत्वर ॥ माधवमुखासींलावित ॥ ८१ ॥ तेसमयींमुनीअंगना ॥ ओंवाळीतीभावेंगजानना ॥ तवतोंअ
ट्टहास्येंकरीरोदना ॥ तेव्हांसुमदास्तनींलावित ॥ ८२ ॥ रोदनशब्दहापडतांकानी ॥ दानवत्वरेंआलेधांवोनी ॥ तयानींबालकनयनींलक्षुनी ॥
धांवतीरायासीसांगावया ॥ ८३ ॥ मायापुरीसयेवोनिया ॥ सेवकवदतीअगाराया ॥ सुमदाप्रसवलीसेतनया ॥ आतांचीचालेसत्वर ॥ ८४ ॥
धुमासूरआणिधुम्रवर्ण ॥ बैसलेअसतांसर्वप्रधान ॥ तयानीऐकतांवचन ॥ क्रोधायमानजाहले ॥ ८५ ॥ तेव्हांक्रोधाउनीधुमासूर ॥ सिद्धक
रोनीयादळभार ॥ स्वयेंनिघालाअतीसत्वर ॥ प्रधानसंगेंघेऊनी ॥ १८६ ॥ ठोकील्याअसंख्यरणभेरी ॥ नादकोंदलाअंबरीं ॥
गजरथतुरंगावरी ॥ बैसोनीवीरनिघाले ॥ १८७ ॥ चतुरंगचालीलादळभार ॥ सिंहनादेंगर्जतीवीर ॥ कींपसरलाथोरसागर ॥
तेवींसैन्यदिसतसे ॥ १८८ ॥ पदधुळदाटलीनभोदरीं ॥ तेणेंभानूआच्छादिलाअंबरीं ॥ धुमासूरवेधोनीरथावरी ॥ स्थावर
क्षेत्रींपातला ॥ १८९ ॥ येतांलक्षुनीदानवभार ॥ माधवझालाचिंतातुर ॥ नसुचेकांहींमनींविचार ॥ स्तब्धझालासेतेकाळीं ॥ १९० ॥
त्रिकाळज्ञानीकौंडण्यमुनी ॥ माधवासन्मुखत्वरेंप्रगटोनी ॥ वदताझालातयेक्षणीं ॥ चिंतानकरीमानसी ॥ ॥ ९१ ॥ चिंताहारकहाचिंताम
णी ॥ तवपुत्रझालासेमोक्षदानी ॥ तरीचिंताकिमपीनकरीमनीं ॥ सांगतोंश्रवणकरींकां ॥ ९२ ॥ धुमासुरभागतांतवसुत ॥ देईंतयासीहाएक
दंत ॥ संशयनधरितांकिंचित ॥ स्वाधीनकरीतयाच्या ॥९३॥ भीतिनधरितांमानसी ॥ सत्यमानीममवचनासी ॥ वधोनियादानवासी ॥ येई

॥इति श्रीचिंतामणीविजयग्रंथएकादशोऽध्याय स०॥

लमाघरींतुजपासी ॥ ९४ ॥ तेंव्हांसुमदावदेअहोराया ॥ मायामोहसर्वत्यागुनियां ॥ पुत्रतयासीदेवोनियां ॥ आत्मरक्षणकरावें ॥ ९५॥ सत्य
मानाहेंमुनीवचन ॥ द्यावयानकरावाअनमान ॥ प्रत्यक्षहागजानन ॥ कायकरीलहेंनकळेची ॥ ९६ ॥ तेंव्हांमाधवेंमुनीपदींनमोन ॥ ह्मणेमा
न्यमातेंतववचन ॥ संकटींरक्षीसीधांऊन ॥ आह्मांलागीस्वामीया ॥ ९७ ॥ मुनीनेंउभयांसीसंबोखोनी ॥ निजाश्रमींगेलातयेक्षणीं ॥ तेंव्हांसु
मदामाधवआनंदोनी ॥ गजाननामींरंगले ॥९८॥ पुढीलअध्यायींकथासुरस ॥ लिलाकरीलश्रीगणेश ॥ वधोनीयाधुमासुरास॥ युद्धकरोनीअ
द्भुत ॥ ९९ ॥ कथानकहेंअतीरसाळ ॥ चित्तींआल्हादहोयप्रबळ ॥ अनंतदुःखांचेंहोयानिर्मुळ ॥ श्रवणमात्रेंकरोनी ॥ २०० ॥ चिंतामणीविज
यहाविजयवर्धन ॥ गणेशभागवतींकथामहान् ॥ षष्ठमस्कंधींकेलीकथन ॥ विधीनेंव्यासालागोनी ॥ १ ॥ गणेशलीलायांतअद्भुत ॥ श्रवणेंस्व
चित्तींउल्हासहोत ॥ धुंडीमुखेंहीवदावित ॥ एकदंतहृदयींवसोनी ॥ २ ॥ इतिश्रीचिंतामणीविजयग्रंथ ॥ श्रीगणेशपुराणादिगणेशभागवत ॥
यांतीलसारांशपरिसोतभक्त ॥ एकादशोऽध्यायरसाळहा ॥ २०३ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीगजाननायनमः ॥ मयुरवहनापर्शुधरा ॥ निर्विकारासर्वेश्वरा ॥ सुमुखवदनाविघ्नहरा ॥ भक्तपालकाजगदीशा ॥ १ ॥
स्वानंदवासीयागजानना ॥ गुणालयादयाघना ॥ प्रणववदनासनातना ॥ भवहरणाभालचंद्रा ॥ २ ॥ अग्रपूजेचातुंमूळधनी ॥ जेष्ठराजचिं
तामणी ॥ ब्रह्मणस्पतीमोक्षदानी ॥ वेदपुराणेंवर्णिती ॥ ३ ॥ गजाननहींअक्षरेंचार ॥ वाचेसीहोतांहाउच्चार ॥ करितसेभवभयपार ॥ पाप
मूळासहजाळूनी ॥ ४ ॥ ऐसीतवनामाचीशक्ती ॥ इच्छितपुरविसीतूंगणपती ॥ जाणोनिअंतरींसद्दढभक्ती ॥ सायुज्यतापददेसीतूं ॥ ५ ॥
घुंडीदासहेंजाणोनीमनीं ॥ रतलाअखंडनामस्मरणीं ॥ तेणेंहृदयींअखंडवसोनी ॥ स्वगुणस्वयेंवदविसी ॥६॥ मागीलअध्यायींकथाअद्भुत ॥
चिंतामणीहोतांमाधवसुत ॥ घुमासूरासीहीकळतांमात ॥ स्थावरक्षेत्रींपातला ॥ ७ ॥ पाचारोनीयादशकंदर ॥ तयासीवदेघुमासूर ॥ जावो
निआणिसुमदाकुमर ॥ मीनजायत्यास्थानीं ॥ ८ ॥ सुमदेपासींजावोनिया ॥ केवींक्षमूंतिचियातनया ॥ जरीजातांतेथेंमागावया ॥ मोहमा
तेंउपजेल ॥ ९ ॥ तियेनीमातेंलक्षितांनयनीं ॥ आक्रोशकरीलतयेक्षणीं ॥ तेव्हांजाणमजलागुनी ॥ शब्दनफुटेबोलावया ॥ १० ॥ यास्तव
तूंचीतेथेंजावोनीआतां ॥ मागोनीआणिसुमदासुता ॥ दशवदनेंशब्दऐकतां ॥ त्वरेंपातलाक्षेत्रभुवनीं ॥ ११ ॥ आश्रमींयेवोनीदशवदन ॥
सुमदामाधवासीभेटून ॥ मागेंबालकतयालागुन ॥ उभासन्मुखराहोनी ॥ १२ ॥ सुमदेनेंस्वनंदनआणून ॥ रावणाकरींकरीअर्पण ॥ तयानें
शीघ्रनेऊन ॥ रथींघातलातेकाळीं ॥ १३ ॥ घेऊनीजातांस्वसुत ॥ सुमदामाधवहर्षभरीत ॥ हेंरावणेलक्षितांनिश्चित ॥ मोदचित्तींपावला ॥
॥ १४ ॥ ह्मणेधन्यपतीव्रताहीमहान् ॥ सत्यकेलेंआपुलेंवचन ॥ वेगेंचालोनियादशवदन ॥ घुमासुरासीभेटला ॥ १५ ॥ त्वरेंउचलोनीसुमदा
सुतासी ॥ दानवकरींअर्पितांत्यासी ॥ क्रोधायमानजाहला ॥ १६ ॥ तेव्हांबालकत्वरेंउचलोनी ॥ वामहस्तेंधरिलेचरणदोन्ही ॥ शस्त्रघेतलेंत
त्क्षणीं ॥ सव्यकरींतेकाळीं ॥ १७ ॥ करींशस्त्रलखलखीत ॥ तेणेंदिशाउजळल्यासमस्त ॥ उर्ध्वकरोनीक्रोधेंहस्त ॥ वधावयासीतेकाळीं ॥
॥ १८ ॥ जोपरमात्मानिर्विकार ॥ मायातीतविश्वाधार ॥ तयासीघुमासूरपामर ॥ वधीनह्मणेपुरुषार्थें ॥ १९ ॥ तेव्हांनवलकरीएकदंत ॥ त
याचात्वरेंपिळोनिहात ॥ गर्जनाकरुनीअत्याद्भुत ॥ गगनोदरींउडाला ॥ २० ॥ स्वरुपधरोनियाविशाळ ॥ रणींउतरलासेतत्काळ ॥ हस्तींधरो
नियांत्रिशुळ ॥ सिद्धझालायुद्धासी ॥ २१ ॥ तयासीलक्षितांघुमासूर ॥ तप्तझालासेतेव्हांफार ॥ शस्त्रदेखोनियासमोर ॥ लोटलावेगेंतयावरी॥
॥ २२ ॥ क्रोधावलेरावणादिक ॥ समरींभीडतीएकएक ॥ युद्धकरतीअलोलीक ॥ पायनठेवितीमाघारी ॥ २३ ॥ थोरमातलीरणधुमाळी ॥
हांकादेतीमहाबळी ॥ पिळोनियावीरसकळी ॥ शस्त्रेंवर्षतीअनिवार ॥ २४ ॥ मातलायुद्धाचाकडकडाट ॥ वायुसतेथेंनफुटेवाट ॥ भिडतीर

णींवीरउद्धट ॥ वधूंइच्छितीबालकासी ॥ २५ ॥ सकळांसीदिसेलघुबाळ ॥ धुमासुरासीभासेथोरप्रबळ ॥ वर्षतीसायकअतिसबळ ॥ शस्त्रेंघेवो
नीधांवती ॥ २६ ॥ सुमदासुतअनिवार ॥ कोणासउच्चलोंनदेकर ॥ शस्त्रासहहस्तसत्वर ॥ छेदोनीपाडीक्षणमात्रें ॥ २७ ॥ धनुदिव्यघेवोनी
करीं ॥ युद्धुदसमसायकप्रेरी ॥ दानवजर्जरकेलेसमरीं ॥ कोणीनयेतीसमोर ॥ २८ ॥ तेव्हांअहिमहीदीरावण ॥ धांवलेवर्षतदिव्यबाण ॥ प
राक्रमीसुमदानंदन ॥ छेदुनपाडीक्षणमात्रें ॥ २९ ॥ सोडोनियादिव्यशर ॥ त्र्यांचेहीरथकेलेचूर ॥ आणिकारथींबैसोनीसत्वर ॥ धांवतीतिघे
आवेशें ॥ ३० ॥ अहीमहीचेंजाणोनीवरदान ॥ करीयसेअद्भुतविंदान ॥ मायालाघवीगजानन ॥ दावीकरणीसमरंगणीं ॥ ३१ ॥ अनिवार
आह्मीसुमदासुत ॥ त्र्यांचेतेव्हांउडविलेरथ ॥ अष्टदिशांनींफिरवित ॥ उतरुंनदेभूतळीं॥३२॥सोडोनियाअमितशर ॥ वधीलासमरींदानवभार ॥
झालारणींआहंकार ॥ वीरपळतीदशदिशा ॥ ३३ ॥ तिघेयोद्धेख्यातीवंत ॥ बळेंचीपातलेसमरांत ॥ सायकप्रेरितीअत्याद्भुत ॥ सुमदासुतासी
लक्षोनी ॥ ३४ ॥ आहिमहीआणिदशानन ॥ विपुळसनतोनीतीवान ॥ सातवाबलाढ्यबुद्धिमान ॥ धांवलेवेगेंसमरासी ॥ ३५ ॥ अश्वासोनी
पळतीयासी ॥ परतवीलेसर्वसमरासी ॥ घेघेह्मणोनीतयासी ॥ वर्षतीसायकअनिवार ॥ ३६ ॥ सप्तांनींअष्टदिशारोधोनी ॥ शस्त्रेंप्रेरितीरणांग
णीं ॥ आच्छादिलासेदिनमणी ॥ केलाअंधकारतेकाळीं ॥ ३७ ॥ तयांचादेखोनिस्वटाटोप ॥ करीलाघवगणाधिप ॥ सायकवर्षोनियाअनुप
दानवदळसंहारीलें ॥ ३८ ॥ सोडोनियासप्तशर ॥ सातांचेछेदिलेंरहंवर ॥ सर्वेचबाणअतीसत्वर ॥ सोडिलेंतेव्हांसक्रोधें ॥ ३९ ॥ वधिलेअ
मीतदानवथाट ॥ पळावयावीरांसीनमिळेवाट ॥ चालावयारथनीट ॥ मार्गसपाटकेलासे ॥ ४० ॥ आल्हादचक्रवतफिरेमयूर ॥ लोटलासमरीं
रक्तपूर ॥ दानवदळाचासुटलाधीर ॥ पळतीसैनकदशदिशा ॥ ४१ ॥ अतीलाघवीएकदंत ॥ सोडोनियाशरसात ॥ सातीउडविलेरथासहीत ॥
भगनोदरींतेकाळीं ॥ ४२ ॥ शत्रुचेंलक्षुनीयासमर ॥ क्रोधावलाधुमासूर ॥ रथींवेधोनीअतीसत्वर ॥ समरभूमीसीलोटला ॥ ४३ ॥ दिव्यसा
यकस्वरेंवर्षोनी ॥ घाबराकेलाचिंतामणी ॥ मयूरमुर्च्छितपाडीलारणीं ॥ क्षणएकनलागतां॥४४॥ पराक्रमतयाचालक्षुनीथोर ॥ क्रोधावलासेलं
बोदर ॥ परशुघेऊनीअतीसत्वर ॥ समरंगणींधांवला ॥ ४५ ॥ परशुघायेंकरुन ॥ रथसमरींकेलाचुर्ण ॥ तेव्हांमयुरसावधहोऊन ॥ दानवावरी
धांवला ॥ ४६ ॥ धुमासुरेंदिव्यशर ॥ अमितप्रेरिलेमयुरावर ॥ तेणेंवदनपसरोनियाथोर ॥ भक्षीआनंदेंनाचोनी ॥ ४७ ॥ धुमासूरक्रोधावला ॥१॥
तेवेळीं ॥ शक्तीतयावरीझोंकिली ॥ तीहीमयुरेंतत्काळगिळीली ॥ रणांगणींतेकाळीं ॥ ४८ ॥ दिव्यशस्त्रमगघेऊनीहातीं ॥ क्रोधेंप्रेरितांतयावर
ती ॥ गणेशेंपरशटाकोनित्वरितमती ॥ छेदोनिपाडिलीएकिकडे ॥ ४९ ॥ तेव्हांसप्तउतरतांयुद्धमेळीं ॥ पुन्हाउडविलेंनभमंडळीं ॥ ऐसेंलक्षि

तांदानवबळी ॥ क्रोधायमानजाहला ॥ ५० ॥ धुमासूरबहुख्यातिवंत ॥ क्रोधेंसायकवर्षोनीआमित ॥ वधूंपाहेसुमदासूत ॥ समरंगणींतेकाळीं ॥
॥ ५१ ॥ लक्षोनिऐसेंविघ्नहर ॥ वेगेंआरुढोनीमयुरावर ॥ सोडोनियांअमितशर ॥ जर्जरकेलेंधुमासूरा ॥ ५२ ॥ दानवप्रेरीजेजेबाण ॥ तेद्विखं
डकरीनलागतांक्षण ॥ चपलयोद्धागजानन ॥ लागोंनदेबाणआंगीं ॥ ५३ ॥ क्रोधाऊनीतेव्हांधुमासूर ॥ सन्मुखलक्षोनियामयूर ॥ दहनकरा
वयासीसत्वर ॥ दहनअस्त्रासीप्रेरिलें ॥ ५४ ॥ वन्हीदाटलासेअत्याद्भूत ॥ लक्षितांतसझालाएकदंत ॥ पर्जन्यअस्त्रप्रेरुनीत्वरीत ॥ अग्निशांतके
लासे ॥ ५५ ॥ दानवेंसोडितांवातास्त्र ॥ पर्वतास्त्रासीप्रभुप्रेरित ॥ दानवेंटाकोनीवज्रास्त्र ॥ कुलिशतेव्हांपिष्ठकेलें ॥ ५६ ॥ अनंतअस्त्रेंदिव्यश
र ॥ प्रेरिताझालाअंधःकार ॥ हेंदेखोनिविघ्नहर ॥ परशुघायेंनिवारिलें ॥ ५७ ॥ लीलालाघवीमयुरेश्वर ॥ सोडोनियादिव्यशर ॥ चापभातारहेव
र ॥ चूर्णकेलारणांमणीं ॥ ५८ ॥ दानवसेनेचाकेलाअंत ॥ धुमासूरएकटाउभारणांत ॥ तेव्हांप्रधानधांवलेअतीत्वरीत ॥ विपरीतनयनींलक्षि
तां ॥ ५९ ॥ सुमदासुतेंशरसोडोनी ॥ सप्तहीमुर्च्छितकेलेरणीं ॥ तेव्हांधुमासूरआवेशोनी ॥ मलयुद्धासीमिसळला ॥ ६० ॥ धरोनियाविशाळ
रुप ॥ मांडिलासमरींखटाटोप ॥ हेंलक्षुनियागणाधिप ॥ धरिलेंस्वरुपशतगुणी ॥ ६१ ॥ सक्रोधेंधांउनिघडकादेती ॥ हस्तचपेटेंत्वरेंताडिती ॥ व
र्मेपाहोनिहाणिती ॥ वज्रमुष्टीएकमेकां ॥ ६२ ॥ सप्तदीनरजनी ॥ मल्लयुद्धकरतीसमरंगणीं ॥ जयइच्छाधरोनीमनीं ॥ घडकादेतीएकमेकां ॥
॥ ६३ ॥ रात्रंदिवसयुद्धहोत ॥ अवकाशनसेपळमात्र ॥ जयइच्छाधरोनीमनांत ॥ समरींभिडतीअतीनिगुती ॥ ६४ ॥ गगनींसुरवरविमानीं ॥
युद्धकौतुकविलोकितीनयनीं ॥ तेव्हांकायकरीमोक्षदानी ॥ दानवअंतकरावया ॥ ६५ ॥ विक्राळस्वरुपअवलंबोनी ॥ धुमासुरासींउचलीलेंतये
क्षणीं ॥ चरणमानेसीधरुनी ॥ मोटकेलीतेकाळीं ॥ ६६ ॥ स्वबळेंदडपोनियात्याला ॥ आननामार्जीत्वरेंटाकिला ॥ हेंप्रधानेंसर्वलक्षीतांडो
ळां ॥ समरत्यागोनीपळताती ॥ ६७ ॥ विजयीहोतांलंबोदर ॥ सुमनवृष्टीकरतीसूर ॥ दुंदुभीनादेंकोंदलेंअंबर ॥ यशवर्णितीप्रभुचें ॥ ६८ ॥
तेव्हांकौंडण्यमनींआनंदोनी ॥ माधवासीवदेतयेक्षणीं ॥ बालकासीआणिजावोनी ॥ समरांतविजयीजाहला ॥ ६९ ॥ रणींमर्दिलाधुमासुर ॥ सेनेचा
केलासंहार ॥ विजयीझालातवकुमर ॥ त्वरेंजाईआणावया ॥ ७० ॥ उभयानींमुनीचीऐकतांवाणी ॥ सद्भावेंलागलेतयाच्याचरणीं ॥ वदतीते
व्हांआनंदानी ॥ पाणीद्वयजोडोनी ॥ ७१ ॥ त्रिकाळज्ञानीतूंयोगेश्वर ॥ तरीबालकेंकेवींकेलासमर ॥ महाबलाढ्यधुमासुर ॥ वधिलेंकैसेंतया
सी ॥ ७२ ॥ नाहींझालेतीनदिन ॥ केलेंकेवींसमरंगण ॥ तरीसमुळकरोनीयाकथन ॥ संशयआमुचावारीहा ॥ ७३ ॥ प्रेमळऐकतांतयाचेंव
चन ॥ मुनीहोवोनीआनंदघन ॥ धुयासूराचावधसंपूर्ण ॥ कथिताझालातेकाळीं ॥ ७४ ॥ देवाधिदेवहाचिंतामणी ॥ अनंतब्रह्मांडेंजयाच्या

वदनीं ॥ ज्यानेंविधीहरीहरनिर्मोनी ॥ केलाखेळहास्वलीले ॥ ७५ ॥ तयासीतुंबालकवदसीराया ॥ अत्याद्भुतहीतयाचीमाया ॥ तोमीएकमु
खेंवर्णाया ॥ शक्यनहोयसर्वथा ॥ ७६ ॥ तुजठाऊकअसतांरणवार्ता ॥ मातेंगौरविसीअनंता ॥ हेंनवलमजबहुवाटतेंचित्ता ॥ गणेशमायाही
अगम्य ॥ ७७ ॥ तेव्हांसंग्रामलीलाकरितांकथन ॥ सुमदामाधवआनंदोन ॥ अश्रुवेंभरलेतेव्हांनयन ॥ सद्भावेंनमितीमुनीसीं ॥ ७८ ॥ प्रार्थो
निआनंदेंकौंडण्यासी ॥ माधवनिघालावेगेंसी ॥ येवोनिलक्षितांसमरासी ॥ आश्चर्यमनींकरितसे ॥ ७९ ॥ अवलोकितांरणकंदन ॥ विस्मित
झालाजनार्दन ॥ अनर्थह्यातवदिसेंमहन ॥ अद्भुतसमरलक्षीतां ॥ ८० ॥ घेतलेम्याबहुअवतार ॥ दानववधिलेथोरथोर ॥ परित्याहोनीदिसेहेंर
णघोर ॥ नलक्षवेंहेंनिजनेत्रीं ॥ ८१ ॥ स्वचित्तींऐसेंविचारोनी ॥ बहुतशोधिलीरणमेदिनी ॥ बालकनदिसेशोधितांरणीं ॥ गहींवरमनींदाट
ला ८२ गणेशमायाअत्याद्भुत ॥ तेणेंभ्रमपावलासेमनांत ॥ मोहीतझालासेमायेंत॥व्याकुळचित्तजाहलें८३ जवळीअसोनीकष्टलाहरी॥ व्यर्थफिरत
सेरणभोंहरी ॥ जेवीकल्पवृक्षअसतांद्वारीं ॥ प्राप्तनहोयदैवयोगें॥८४॥ किंहस्तींयेतांचिंतामणी ॥ गारह्मणोनीटाकीलीवनीं ॥ कींसमीपअसतां
सुगंधपाणी ॥ मृगजळसमभासत ॥ ८५ ॥ तेवींजवळीअसतांचिंतामणी ॥ तयासीनजाणेंचक्रपाणी ॥ कष्टेंशोधिलीरणमेदिनी ॥ परीदृष्टीन
पडेसर्वथा ॥ ८६ ॥ गजाननतेव्हांगहिंवरला ॥ ह्मणेभाकींगोविलेंयानेंमजला ॥ शोधितांमातेंबहुकष्टला ॥ अंतनपहावासर्वथा ॥ ८७ ॥ देवा
धिदेवेंतयेवेळां ॥ मायाजाळदूरकेला ॥ माधवतेव्हांलक्षिताझाला ॥ स्वपुत्रासीतेकाळीं ॥ ८८ ॥ टाहोफोडितांगजानन ॥ रुदनशब्दकानीं
ऐकोन ॥ समीपआलासेधांऊन ॥ बालकनयनींलक्षिला ॥ ८९ ॥ पुनरपीभ्रमलासेअनंत ॥ नानातरंगउद्भवतीमनांत ॥ स्वसुतमानसींभावि
त ॥ चिंतामणीसींलक्षितां ॥ ९० ॥ नाहींझालेतीनादिन ॥ उरींदानवशवपडलेंमहान् ॥ बालकरडेआक्रंदोन ॥ कासाविसझालेंसे ॥ ९१ ॥
माधवतेव्हांगहिंवरोनी ॥ दानवशवलोटिलेंझणी ॥ सद्गदअंतरींहोवोनी ॥ घेतउचलोनीतान्हियासी ॥ ९२ ॥ बालकासीहृदयींधरितां ॥ माये
नेंमोहिलेंअनंता ॥ ह्मणेमुनीनेंकथिलीरणवार्ता ॥ हेंतवअघटीतभासत ॥ ९३ ॥ बालकतान्हाहासकुमार ॥ केवीकेलेंयानेंसमर ॥ वाटेमातेंन
वलथोर ॥ वधिलेंकैसेंदानवासी ॥ ९४ ॥ बालकहेंतवअज्ञान ॥ शस्त्रधरावयानसेज्ञान ॥ केलेंकेवींशरसंधान ॥ नवलचित्तींवाटतें ॥ ९५ ॥ ऐसा
संशयजडतांअंतरीं ॥ विघ्नेशतेव्हांकायकरी ॥ हृदयींधरिलाजोदोहींकरीं ॥ तोंनवलकरीतसमयीं ॥ ९६॥ तिळातिळजडहोयलंबोदर ॥ माधव
तेव्हांसांवरीकर ॥ वाढलाभारआतीथोर ॥ नधरवेंकरीतान्हियासी ॥ ९७ ॥ तेव्हांअनंतकरानींसांवरोनी ॥ बालकधरितांउचलोनी ॥ धापेंदा
टलातयेक्षणीं ॥ पदनउचलेंचालतां ॥ ९८ ॥ माधवतेव्हांश्रमलाभारी ॥ बालकघेवोनिअंकावरी ॥ बैसलासेश्रमोनीसमरीं ॥ व्याकुळचित्तीं

होवोनी ॥ ९९ ॥ तेंव्हांमोरेंदडपीतांअंकदोन्ही ॥ व्याकुळझालातयेक्षणीं ॥ मांडीरुतलीसेमेदिनी ॥ उपायकांहींनचाले ॥ १०० ॥ तेंव्हां
माधवेंउपायकेलेअनंत ॥ मांडीवरचानहालेसुत ॥ शक्तिहारपलीसमस्त ॥ नधरवेधीरतेकाळीं ॥ १ ॥ त्रिकाळज्ञानीकौंडण्यमुनी ॥ प्रगट
झालासमरंगणीं ॥ माधवेंतयासीलक्षितांनयनीं ॥ आनंदचित्तींदाटला ॥ २ ॥ रायासीवदेमगयोगेश्वर ॥ संशयेंभ्रमदाटलाफार ॥ पूर्णब्रह्महा
जगदोद्धार ॥ कैसानजाणसीतयासी ॥ ३ ॥ रचीपाळीकरितअंत ॥ सुत्रधारीहाभगवंत ॥ शक्तीअसेअत्याद्भुत ॥ कैसानजाणसीमानसीं ।४।
बालकयातेंतूंमानिसी ॥ यासंशयानेंभ्रमलासी ॥ तरीपुर्वींकथिलेंन्याज्ञानासी ॥ तयाचालोपझालाकां ॥ ५ ॥ वदतांऐसेंकौंडण्यमुनी ॥ मा
धवआनंदपावलामनीं ॥ ह्मणेपरब्रह्महामोक्षदानी ॥ अगम्यलीलाययाची ॥ ६ ॥ संशयविरालासमस्त ॥ अंतरझालेंसद्गदीत ॥ ह्मणेदेवाधिदे
वहाएकदंत ॥ महिमाअद्भुतययाचा ॥ ७ ॥ सप्रेमहोतांअंतर ॥ तुष्टलामनींलंबोदर ॥ आकर्षिलादेवेंभार ॥ तेंव्हांमाधवचित्तींआनंदला॥८॥
मुनिसीकरोनीदंडवत ॥ हृदयींधरोनीएकदंत ॥ स्वआश्रमासीत्वरित ॥ येताझालातेसमयीं ॥ ९ ॥ सुमदेकरींदेतांतान्हा ॥ फुटलातियेसी
प्रेमपान्हा ॥ कुमरलाविलासेस्तना ॥ पल्लवाखालींझांकोनी ॥ ११० ॥ सुमदेससांगतांरणवार्ता ॥ गहिंवरदाटलातीयेच्याचित्ता ॥ ह्मणेकरु
णाकराभगवंता ॥ रक्षिलेंसीआजीतान्हिया ॥ ११ ॥ महान्पराक्रमीधुमासूर ॥ समरींजिंकीलेसुरासूर ॥ तयाचासमरींकेलासंहार ॥ हेंतोनव
लवाटतें ॥ १२ ॥ क्रोधेंपिपिलीकाधांवोनी ॥ प्राशनकेलावडवाग्नी ॥ तेवींबालकेंसमरंगणीं ॥ दानवआजीवधियेला ॥ १३ ॥ सुमदेचीऐसी
ऐकतांवाणी ॥ माधववदेतयेक्षणीं ॥ संशयआतांनधरीमनीं ॥ बालकनसमजेययासी ॥ १४ ॥ म्यालक्षितांसमरंगण ॥ संशयेंरोधिलेंमाझेंम
न ॥ केलामाझाभ्रमनिरसन ॥ प्रत्यक्षआजीसमरंगणीं ॥ १५ ॥ तोसमूळकथिलावृत्तांत ॥ समरींसंकटहोतांप्राप्त ॥ तेंव्हांमुनीप्रगटोनियाते
थ ॥ शांतकेलेंमजलागी ॥ १६ ॥ पूर्णब्रह्महासनातन ॥ स्वानंदाधीशगजानन ॥ ययाच्यामायेपासून ॥ त्रयजगादिसर्वउद्भवले ॥ १७ ॥
पतीचेसुशब्दऐकतांकानीं ॥ सुमदाहर्षलीबहुतमनीं ॥ प्रेमांबुधारालोटल्यानयनीं ॥ तान्हामांडीविलोकितां ॥ १८ ॥ इकडेयुद्धींपडतांधुमा
सूर ॥ उरलाघेवोनीदळभार ॥ अहिमहीदिदशकंदर ॥ मायापुरींपातले ॥ १९ ॥ नमोनीधुम्रवर्णासी ॥ दीनवदनेंवदतीत्यासी ॥ सुमदासुतें
करोनिसमरासी ॥ धुमासुरासीवधीयेलें ॥ २० ॥ ऐसेंसमरकधींआजवरी ॥ नाहींदेखिलेंनिरधारी ॥ बालकेंयुद्धकेलेंसमरीं ॥ ऐकीलेंनाकधीं
विलोकिलें२१महाबलाढ्यसुमदासुत ॥ समरकेलेंअत्याद्भुत ॥ सर्वांचाकेलारणींअंत ॥ अतीबलाढ्यवीरतो ॥ २२ ॥ प्रधानमुखींचीऐकतांवा
णी ॥ धुम्रवर्णेंताडितांमस्तकींपाणी ॥ मुर्च्छितपडिलासभास्थानीं ॥ धरणीवरीतेसमयीं ॥ २३ ॥ प्रधानादिपुत्रयेवोनी ॥ सांवरोनीबैसविला

सिंहासनीं ॥ प्रार्थितीहस्तजोडोनी ॥ शत्रूसीवधूंनिश्चयें ॥ २४ ॥ वधावयासुमदासुत ॥ करुंआतांयत्नअनंत ॥ धीरधरीआतांनिश्चित ॥ विचारकरूंयागोष्टीचा ॥ २५ ॥ सन्मुखशत्रूसींनभिडतां ॥ वधकरावाअवचिता ॥ सचीववाक्यहेंऐकतां ॥ धुम्रवर्णसंतोषला ॥ २५ ॥ पाचारोनि मेघासुर ॥ वदेतयासीदशकंदर ॥ वधीकपटेंसुमदाकुमर ॥ गुप्तरुपेंजावोनी ॥ २६ ॥ नानाउपायकरुन ॥ साधीकार्यआतांमहान् ॥ मोहित करीमोहनघालुन ॥ शत्रुचाअंतकरावया ॥ २७ ॥ निशींतजावोनीअकस्मात ॥ दृष्टीगोचरनहोतांतेथ ॥ वधींजावोनीसुमदेसहीत ॥ नकरी विलंबयेकाळीं ॥ २८ ॥ वचनऐकतांमेघासुर ॥ वदेतेव्हांक्रोधातुर ॥ करोनीअद्भुतचमत्कार ॥ वधीनसुतसुमदेचा ॥ २९ ॥ रायाचिंतानकरी मानसीं ॥ कार्यसाधीनहेंनिश्चयेसीं ॥ मोहनेंमोहोनीसर्वांसीं ॥ वधीनमाधवासमवेत ॥ ३० ॥ धुम्रवर्णसुशब्दऐकोनी ॥ मोदपावलाअंतःकरणीं ॥ मानदेवोनीसभास्थानीं ॥ आज्ञापितजावया ॥ ३१ ॥ रायासीकरोनीनमस्कार ॥ वेगेंनिघालामेघासुर ॥ अतीआवेशेंसत्वर ॥ स्थावरक्षेत्रायेतसे ॥ ३२ ॥ तेव्हांधुमासुराचीप्रीयकांता ॥ महासाध्वीपतीव्रता ॥ तियेनंपतीनिधनऐकतां ॥ रुदनकरीदीर्घस्वरें ॥ ३३ ॥ अलंकारभूषणेंसर्वत्यागोनी ॥ ताडितमस्तकींद्वयपाणी ॥ अश्रुधारास्रवतीनयनीं ॥ निचेष्टितपडलीधरणीवर ॥ ३४ ॥ त्वरेंसख्याधांवोन ॥ बैसविलीतेव्हांसांवरोन ॥ उन्मीळामानसींआनंदोन ॥ वदतीझालीतेकाळीं ॥ ३५ ॥ कृपासागराप्राणनाथा ॥ तरिमजकांत्यजिलेंआतां ॥ त्यागोनीकैसीहीप्रियकांता ॥ एकटेंकसेजातसा ॥ ३६ ॥ गुणवंतामीसांगातीणी ॥ असतांअर्धअंगवासिनी ॥ तरीप्रीयानितिंबिणीत्यजोनी ॥ ससुखासीसेवितसा ॥ ३७ ॥ समरींजिंकोनीसुरासुर ॥ बंदींघातलेहरीहर ॥ राज्यकेलेंसेआजवर ॥ त्रिभुवनसारेंजिंकोनी ॥ ३८ ॥ जरीमाझा चरणींअसेलभाव ॥ तरीआतांपावेलहादेवाधिदेव ॥ त्यागोनीमीसर्ववैभव ॥ पावेनठावचरणांसी ॥ ३९ ॥ पूर्णब्रह्मसनातन ॥ जोदेवाधिदेव गजानन ॥ तोहोवोनीसुमदानंदन ॥ अवतरलासेविश्वात्मा ॥ १४० ॥ तयानेंघातलेंमुक्तीसत्र ॥ तारावयासीनिजभक्त ॥ तयांलागोनियात्वरित ॥ स्वानंदपददेतसे ॥ ४१ ॥ स्वामीहेजाणोनीअंतरीं ॥ युद्धकरोनीतयासीसमरीं ॥ वश्यकेलासेविघ्नारी ॥ मुक्तीपदहेंसाधावया ॥ ४२ ॥ विरपत्नीमीअसेथोर ॥ देवातवपदींमाझानीरधार ॥ ठावदेमजसाचार ॥ पतीसंन्निधस्वानंदी ॥ ४३ ॥ वदोनीऐसेंतयेक्षणीं ॥ पुजील्याआनंदेंसुवासीनी ॥ सौभाग्यदानेंअर्पोनी ॥ हरीद्राकुंकुमादिअलंकार ४४ पतीचरणआठवोनीमनीं ॥ हृदयींरेखीलाचिंतामणी ॥ इंद्रियेंसर्वआवरोनी ॥ निमग्नझालीस्वरूपांत४५तल्लीनहोतांचीस्वरुपांत ॥ तेणेंजोतीमुरालीज्योतींत ॥ पूर्णकेलामनोगत ॥ स्वानंदपदपावली४६तेव्हांशवपडलेंसेधरणी ॥ आक्रांतकरतीनितंबिनी ॥ रुदनशब्दऐकबांकानीं ॥ धुम्रवर्णघाबरला ॥४७॥ दासीमुखींचेंऐकुतांवचन ॥ सद्गदझालेंअंतःकरण ॥ अश्रुवेंते

व्हांभरलेनयन ॥ दुःखेंविव्हळजाहला ॥ ४८ ॥ शांतवितीतेव्हांआप्त ॥ रायाविचारीस्वचित्तांत ॥ कोणअसेसांगशाश्वत ॥ याभूतळवटींचिर
काळ ॥ ४९ ॥ अक्राराआलेजेजेपदार्थ ॥ तेतेसर्वनाशीवंत ॥ माताबंधुकन्यासुत ॥ कोणीनयेतीसांगातीं ॥ ५० ॥ महासाध्वीहीपतीव्रता ॥
केलीतियेनीस्वसार्थकता ॥ नामइयेचेंमुखींवदतां ॥ दुरितेंनासतीनिश्चयें ॥ ५१ ॥ तेव्हांशास्त्रार्थरायेंपाहुन ॥ उभयांचेंकर्मकेलेंसविधान ॥
अपारसंपत्तीवेचोन ॥ कर्मसर्वसांगकेलें ॥ ५२ ॥ इकडेसुमदामाधवआनंदोन ॥ करतीबालकाचेंनामकर्ण ॥ जोदेवाधिदेवगजानन ॥ तयाचें
नामठेवीती ॥ ५३ ॥ सच्चिद्धनजोमोक्षदानी ॥ पुर्णब्रह्मप्रणववदनी ॥ तयाचेंनामचिंतामणी ॥ ठेवितीआनंदेंतेकाळीं ॥ ५४ ॥ पालखींबा
लोनियाबालक ॥ लीलागातीअलोलिक ॥ झालासकळांसीहरिख ॥ बालकनयनींलक्षीतां ॥ ५५ ॥ मिळालेअपारनारीनर ॥ माधवसोहळा
करीथोर ॥ ऐशासमयींदुराचार ॥ मेघासूरपातला ॥ ५६ ॥ गुप्तरुपेंतयास्थानीं ॥ सोहळाविलोकितांपापखाणी ॥ दानवीमायातयेक्षणीं ॥
प्रगटकरितांझाला ॥ ५७ ॥ तेव्हांमेघदाटलानभमंडळीं ॥ अभ्रकोंदलेंनिशाकाळीं ॥ मेघगर्जोनीनभपोकळी ॥ शुंडाधारीवर्षत ॥ ५८ ॥ वा
युसुटलाअत्याद्भुत ॥ विद्युल्लतालखलखतीबहुत ॥ माधवादिमुनीसमस्त ॥ झालेघाबरेतेकाळीं ॥ ५९ ॥ एकमेकांसीकवळोनीधरती ॥ आक्रं
दोनीहांकादेती ॥ कितीकपडतीभूवरती ॥ जीवभयेंकरोनी ॥ ६० ॥ करितांऐसेंदानवानी ॥ मायातयाचीनजाणतीकोणी ॥ विद्युल्लतापड
तीधरणी ॥ कडकडोनीतेसमर्थी ॥ ६१ ॥ पर्जन्यदाटलाबहुत ॥ अंधारझालाअत्याद्भुत ॥ विकळझालेजनसमस्त ॥ नदिसेकांहींलक्षीतां ॥
॥ ६२ ॥ ऐशासमर्थीविद्युल्लता ॥ कडकडोनीपडतीमाथा ॥ दानवेंलक्षोनीसुमदासुता ॥ क्रोधेंलोटलातयावरी ॥ ६३ ॥ देवाधिदेवजोनिर्गु
णी ॥ तयाचेमायेचीअगाधकरणी ॥ तेव्हांनवलकरीमोक्षदानी ॥ दानवकपटजाणोनी ॥६४॥ हेतुतयाचाजाणोनीमनीं ॥ हुंकारसोडिलातयेक्ष
णीं ॥ तेणेंमेघगेलासेनिरसोनी ॥ नक्षत्रमालासर्वदिसती ॥ ६५ ॥ असुरतेव्हांक्रोधावला ॥ महागीरीकरींघेतला ॥ चुर्णकरावयाझोंकीला ॥
पर्णकुटीसहसर्वांसी ॥ ६६ ॥ गणेशेंपर्शुटाकोनिसत्वर ॥ दानवासहनगाचाकेलाचुर ॥ शवपडलेंधरणीवर ॥ चारयोजनेंविस्तीर्ण ॥ ६७ ॥
तेव्हांहुंकारसोडोनीसत्वरी ॥ शवउडविलेंगगनोदरीं ॥ तेंभ्रमतभ्रमतचक्रापरी ॥ मायापुरींयेवोनीपाडिलेंसे ॥ ६८ ॥ प्रेतपडतांमहाद्वारीं ॥
दुर्गचर्याकोसळलीसत्वरी ॥ रक्षकभयपावोनीअंतरीं ॥ शंखकरीतधांवती ॥ ६९ ॥ कित्येकसेवकशवातळीं ॥ दडपोनीमेलेतत्काळीं ॥ दणाणा
ऐकतांतयेवेळीं ॥ नगरजनघाबरले ॥ ७० ॥ धुम्रवर्णासीसांगतीदुत ॥ मेघासुराचाझालाअंत ॥ नगरद्वारींपडीलेंप्रेत ॥ कोणीमारीलेंनकळे
ची ॥ ७१ ॥ दुतमुखींचेंऐकतांवचन ॥ चिंतावलाधुम्रवर्ण ॥ मुखश्रीगेलीउतरोन ॥ अधोवदनेंविलोकी ॥ ७२ ॥ वदेतेव्हांदैत्यपती ॥ अ

घटितघडलेंहेंनिश्चिती ॥ काळाचीकेवीविपरीतगती ॥ मुषकेंअहिसभक्षिलें ॥ ७३ ॥ किंमक्षिकेच्याअंगवातें ॥ निरभ्रकेलेंगगनोदरातें ॥ कीं
पिपीलीकच्यापदघातें ॥ गीरिचुर्णजाहला ॥ ७४ ॥ कींजंबुकेंक्रोधेंबांधोनी ॥ हरीसआणिलाबांधोनी ॥ तेंविझालोविपरीतकरणी ॥ नवल
दायकयेकाळीं ॥ ७५ ॥ सुमदासुतअज्ञान ॥ मेघासुराचेंकेलेंहनन ॥ तरिकाळफिरलाआतांजाण ॥ आलेंमरणयावरी ॥ ७६ ॥ चिंताग्नीनें
आहळीलेंअसुरास ॥ चैननपडेरात्रंदिवस ॥ सुमदानंदनभासेंतयास ॥ जागृतीस्वप्नींसर्वदा ॥ ७७ ॥ गोडनलागेंअन्नपाणी ॥ भितीवाटेक्ष
णोक्षणीं ॥ दशाननानेंहेंजाणोनीमनीं ॥ करींसमाधानतेवेळां ॥ ७८ ॥ आतांचिंतानकरीमानसीं ॥ शत्रुसवधूंनिश्चयेसीं ॥ नानापरीतयासी ॥
संबोखिलातेवेळां ॥ ७९ ॥ बाहोनितेव्हांसुलक्षणेसी ॥ वदताझालानिजगुह्यासी ॥ वधींजावोनीसुमदासुतासी ॥ स्थावरक्षेत्राजावोनी ॥८०॥
कार्यनसाधेतुजवांचुनी ॥ हेंगुह्यजाणोनीअंतःकरणी ॥ रायासीचिंतालागलीमनीं ॥ तीदुरकरीयेकाळीं ॥८१॥ सुलक्षणेंऐकोनिवचन ॥ ह्मणेवधी
नमीसुमदानंदन ॥ मायामाझीविचीत्रगहन ॥ हरिहरकदानेणती ॥ ८२ ॥ दाढेंतरगडीनकाळासी ॥ शिक्षाकरोनिसुरासुरांसी ॥ भक्षीनसत्यसु
मदासुतासी ॥ माधवसुमदासमवेत ॥ ८३ ॥ दानवीचेंऐकतांवचन ॥ हर्षपावलाधुम्रवर्ण ॥ वस्त्रालंकारदेवोन ॥ गौरवकेलातियेचा ॥ ८४ ॥
सुलक्षणामनींबहुहर्षली ॥ स्थावरींजावयासिद्धझाली ॥ विक्राळरुपधरोनितेवेळीं ॥ जातसेरायासीनमोनी ॥ ८५ ॥ विशाळपसरोनीवदन ॥
बाबरझोटीलंबायमान ॥ कज्जळकांतीआरक्तनयन ॥ दंतदाढाशुभ्रदिसती ॥ ८६ ॥ कुचटाकोनीपृष्ठीवर ॥ मागेंरुळतीयोजनेचार ॥ तेणेंवृक्ष
पाषाणहोतीचुर ॥ धुराळानभींदाटला ॥ ८७ ॥ अंगवातेंवृक्षउडती ॥ पर्वताशिखरेंसर्वहालती ॥ उणीवाटेपवनगती ॥ क्रोधेंजातांतेकाळीं ८८
तेव्हांसेवकप्रार्थितीतियेसी ॥ धरोनीजातांह्यास्वरुपासी ॥ यशनयेकदातुजसी ॥ तरीकपटेंवधींबाळकातें ॥ ८९ ॥ कर्णींऐकतांदुतवाणी ॥
आनंदपावलीअंतःकरणीं ॥ झालीदिव्यनितिंबिनी ॥ कमलाकिंरमाप्रत्यक्ष ॥ ९० ॥ देखोनीतियेचेंवदन ॥ कलाहीनदिसेशचीरमण ॥ मृग
नेत्रींसुहास्यवदन ॥ कुरळकेशशोभती ॥ ९१ ॥ गजगामिनीपीतवर्ण ॥ कुचकमंडलुसमान ॥ ऐसासुवेषासीअवलंबुन ॥ स्थावरक्षेत्रापातली ॥
॥ ९२ ॥ क्षेत्राधिपतीरणभैरव ॥ तयानेंलक्षीतांरुपवैभव ॥ रक्षणत्यागोनीयासर्व ॥ मोहितझालातेसमयीं ॥ ९३ ॥ तपध्यानसर्वत्यागोनी ॥
मोहितझालाशुळपाणी ॥ वसंतेंलक्षोनीयानयनीं ॥ रुंजीघालीपदकमळीं ॥ ९४ ॥ आश्चर्यकरतीसुधापाणी ॥ कोणाचीअसेहीनितिंबिनी ॥
हेंनजाणतीतेव्हांकोणी ॥ मोहपावलेलक्षीतां ॥ ९५ ॥ नयनींलक्षीतांमुनी ॥ स्तब्धझालेतयेक्षणीं ॥ दानवीनेंमायाघालोनी ॥ मोहितकेलेंस
वांसीं ॥ ९६ ॥ माधवाचीयाआश्रमासी ॥ दानवीपातलीवेगेंसी ॥ लक्षीतांतियेच्यास्वरुपासी ॥ चकितझालामानसी ॥ ९७ ॥ सुमदेनील

क्षीतां नयनीं ॥ त्वरेंसन्मुखजावोनी ॥ धरोनियातियेचापाणी ॥ आश्रमींनेतआनंदें ॥ ९८ ॥ प्रेमेंबैसवोनियांआसनीं ॥ वदतीझालीतयेक्षणीं॥
आगमनझालेंकोठोनी ॥ एकट्यावनींपातल्या ॥ ९९ ॥ सुशब्दसुमदेचेऐकतां ॥ आनंदलीदानवीचित्ता ॥ मंजुळवचनेंतत्वता ॥ वदतीझाली
तेसमयीं ॥ २०० ॥ तवमायेचीमीमाय ॥ मातेंतुंहेंपुससीकाय ॥ धावयातुजआश्रय ॥ पातलेंस्नेहेंकरोनी ॥ १ ॥ परलोकींतवमाय
गेली ॥ वनींतुतेंगेल्यागीली ॥ दानवपीडितीवेळोवेळीं ॥ वनींयेवोनीयाअखंड ॥ २ ॥ तवदुःखजाणोनीमनीं ॥ पातलेंमीह्याघोरवनीं ॥ तरी
आतांतुजलाभेटोनी ॥ स्वस्थानासीजाईन ॥ ३ ॥ सुमदेनीसुशब्दऐकून ॥ प्रेमेंकरितांतियेसीनमन ॥ अश्रुवेंसरलेतेव्हांनयन ॥ दानवीशांत
विततियेसी ॥ ४ ॥ अद्भुतगजाननाचीमाया ॥ सुमदानजाणेंदानवीचीचर्या ॥ पुढीलअध्यायींहीप्रगटकरोनीया ॥ सुमदेप्रतीदाखवील ॥ ५ ॥
गजाननलीलाहीअद्भुत ॥ पापसमुळजाळोनीकरीमुक्त ॥ पुरवितस्वमनोगत ॥ श्रवणमात्रेंकरोनी ॥ ६ ॥ चिंतामणीविजयग्रंथ ॥ गणेशभाग
वतींचासारांशयथार्थ ॥ श्रवणींठसावतांप्रेमयुक्त ॥ करीतपारभवासीं ॥ ७ ॥ गणेशकथाहीपावन ॥ धुंडीमुखेंवदवीगजानन ॥ वाढवित
दासाचेंमहिमान ॥ सदयअंतरींहोवोनी ॥८॥ इतिश्रीचिंतामणीविजयग्रंथ ॥ श्रीगणेशपुराणादिगणेशभागवत ॥ यांतीलसारांशपरिसोतभक्त ॥
द्वादशोऽध्यायरसाळहा ॥ २०९ ॥ ॥ श्रीरस्तु ॥ ॥ ॥ श्रीगजाननार्पणमस्तु ॥ ॥ ॥ शुभंभवतु ॥ ॥

॥इति श्रीचिंतामणीविजयग्रंथ द्वादशोऽध्याय स० ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीमोरेश्वरायनमः ॥ मोरेश्वराविधीजावरा ॥ ब्रह्मानंदाजगदुद्धारा ॥ पुराणपुरुषापरात्परा ॥ मंगलधामामंगलेशा ॥ १ ॥
अविनाशहेरंबातुझेंस्थान ॥ पूर्णब्रह्मजेंसनातन ॥ वदतीतयासीस्वानंदभुवन ॥ आनंदतेथेंअखंड ॥ २ ॥ निर्मळस्वरुपानिरंजना ॥ मायाती
ताश्रीगजनना ॥ चराचरसर्वव्यापोनीजाणा ॥ द्विपंचआंगुलेंउरलासी ॥ ३ ॥ निर्गुणरुपीहाचिंतामणी ॥ चिंतीतांदेतअर्धक्षणीं ॥ भक्तरक्ष
णार्थतुंमोक्षदानी ॥ स्थावरभुवनींबैसलासी ॥ ४ ॥ धुंडीदासेंचिंतोनीमनीं ॥ धुंडीशाठेविलेंहृदयभुवनीं ॥ जिव्हाग्रींअखंडवसोनी ॥ स्वगुण
लीलावदविसी ॥ ५ ॥ धुंडीविनवीश्रोतीयांस ॥ मागीलअध्यायींकथासुरस ॥ दानवीभेटोनिसुमदेस ॥ मोहितकेलेंस्वमायें ॥ ६ ॥ तेचवेळीं
चिंतामणी ॥ पालखींखेळतांमोक्षदानी ॥ दानवीचेंकृत्यजाणोनीमनीं ॥ करीरुदनतेधवां ॥ ७ ॥ रुदनशब्दऐकतांकानीं ॥ सुमदाघेतसेपाल
खांतोनी ॥ आनंदेंअंकींघेवोनी ॥ कुचवदनींघालीत ॥ ८ ॥ समजावितांबहुबालक ॥ परिउगानराहेंविनायक ॥ तेव्हांदानवीसझालाहारिख ॥
बालकनयनींलक्षीतां ॥ ९ ॥ सुमदेनेंमगकटींघेवोनी ॥ आंगणींआणिलाचिंतामणी ॥ परीउगानराहेंमोक्षदानी ॥ अट्टहास्येंतेव्हांओरडे ॥
॥ १० ॥ माधवेंघेतांतयासी ॥ सुमदागेलीगृहकामासी ॥ माधवेंसमजावितांबालकासी ॥ स्थीरझालातेकाळीं ॥ ११ ॥ सुमदाकरितसेपा
कनिष्पत्ती ॥ तोंअस्तासीजातसेगभस्ती ॥ माधवउतावेळहोऊनिचित्तीं ॥ पाकसदनींपातला ॥ १२ ॥ ह्मणेघेईआतांबालकासी ॥ मानूजा
तसेअस्तमानासी ॥ उशीरहोतसेनित्यकर्मासी ॥ गणेशतिर्थींजावया ॥ १३ ॥ सुमदेनेंत्वरेंउठून ॥ अंकींघेतलागजानन ॥ निर्मितसेदिव्यअ
न्न ॥ आजीलागीआदरें ॥ १४ ॥ दानवीनेंहेंलक्षुन ॥ मनींझालीआनंदघन ॥ ह्मणेऐसीवेळहीपरतोन ॥ नयेपुन्हाकल्पांतीं ॥ १५ ॥ जेंमी
कृत्यकेलेंहेंअसुप ॥ तेंआतांझालेंफलद्रुप ॥ करितसेमगखटाटोप ॥ स्वहेतपूर्णकरावया ॥१६॥ ह्मणेमाधवनसेयासमयासी ॥ गंगेसगेलासेनि
त्यकर्मासी ॥ तोनयेतांनिजाश्रमासी ॥ कार्यत्वरेंसाधावें ॥ १७ ॥ माधवपराक्रमीअत्याद्भुत ॥ तोंसमीपअसतांनसाधेंहेत ॥ तरीआतांसुमदे
सहीत ॥ बालकासीभक्षावें [illegible]८ ॥ स्वस्वरूपप्रगटनकरितां ॥ वधावेंआतांउभयतां ॥ विचारऐसाकरोचित्ता ॥ उठोनीउभीराहिली ॥१९॥
येवोनीयासुमदेपासी ॥ सुह[illegible]र्नितियेसी ॥ यानेंकेवीवधिलेंदानवासी ॥ बालकसकुमारदिसेहा ॥ २० ॥ सुस्वरुपयाचेंमेलक्षितां ॥ आल्हा
दबहुवाटतोचित्ता ॥ वदोनींऐसेंकरतत्वतां ॥ पसरीतसेध्यावया ॥ २१ ॥ हेतुतियेचाजाणोनीमनीं ॥ झ्यापघालीतांचिंतामणी ॥ दानवीनेंत्वरें
उचलोनी ॥ अंकावरीघेतला ॥ २२ ॥ अंकींबैसवितांविघ्नहर ॥ वाटेंतियेसीतृणभार ॥ आनंदमनींझालाथोर ॥ ह्मणेंकार्यसाधीनयावेळीं ॥
॥ २३ ॥ यानेंवधिलाधुमासूर ॥ अश्चर्यवाटेमजलाथोर ॥ केवीकरोनियासमर ॥ मेघासूरासीमर्दिलें ॥ २४ ॥ सकुमारअसेहाअत्यंत ॥ कर

तळींदाबितांहोईलअंत ॥ विचारोनिऐसेंस्वचित्तांत ॥ कायकरतीजाहली ॥ २५ ॥ कटींघेवोनीचिंतामणी ॥ त्वरेंआसूरीयेतआंगणीं ॥ तेव्हां
नवलकरीतयेक्षणीं ॥ कापट्यमनींकल्पोनी ॥ २६ ॥ बालकधरोनीयाकरतळीं ॥ वेगेंउडालीनभपोकळीं ॥ विशाळरुपधरोनितयेवेळीं ॥ अन
नामाजींटाकीत ॥ २७ ॥ धुम्रवर्णांचेगुप्तहेर ॥ तयानेंलक्षीतांआनंदलेफार ॥ दानवीनेंपराक्रमकरुनीथोर ॥ नेलाकुंभरस्वशक्ती ॥ २८ ॥ तेव्हां
देवाधिदेवएकदंत ॥ मायाज त्याद्भूत ॥ तयानेंआसूरीचाकरावयाअंत ॥ केलेंनवलतेकाळीं ॥ २९ ॥ तान्हादाढेखालींधरोनी ॥ रगडूं
पाहेजोंतयेक्षणीं ॥ तेव्हांथे ठामोक्षदानी ॥ वदनींतत्काळअसूरीच्या ॥ ३० ॥ जिव्हास्वकरेंधरुन ॥ समूळघेतलीउपटून ॥ हृदयदाभाडें
टाकिलींचिरून ॥ हृदयींमुष्टाताडिली ॥ ३१ ॥ तेणेंप्राणासमुकलीअसूरी ॥ शवपडलेंधरणीवरी ॥ तोदणाणाऐकतांसत्वरी ॥ सुमदाबाहेर
येतसे ॥ ३२ ॥ असूरीचेंलक्षीतांप्रेत ॥ सुमदाझालीभयाभीत ॥ अट्टहस्येंओरडत ॥ आश्रमींजातत्वरेंनी ॥ ३३ ॥ माधवेंथोरदणाणाऐक
तांकानीं ॥ आश्रमात्वरेंयेतधांवोनी ॥ तोंदानवीहृदयींचिंतामणी ॥ खेळतसेस्वलीलें ॥ ३४ ॥ तेव्हांउचलोनीघेतलातनयासी ॥ आणोनी
देतसुमदेपासी ॥ ह्मणेयानेंवधीलेंअसुरीसी ॥ बाहेरकेवींटाकीला ॥ ३५ ॥ तेव्हांसुमदासांगेवृत्तांत ॥ आजीनव्हेहीनिश्चित ॥ आलीकरावया
आपुलाघात ॥ कपटवेषेंधरोनी ॥ ३६ ॥ माधवेंतेव्हांसोडोनीशिर ॥ शवउडवोनीटाकिलेंदुर ॥ चारयोजनेंविस्तीर्णथोर ॥ पडलेंजावोनीते
काळीं ॥ ३७ ॥ मायापुरींजावोनीहेर ॥ रायासीकथितीसमाचार ॥ असूरीचाकेलासंहार ॥ सुमदापुत्रेंस्वलीलें ॥ ३८ ॥ दूतेंकथितांसर्ववृत्तां
त ॥ धुम्रवर्णझालाचिंताक्रांत ॥ ह्मणेकर्मकैसेंहेंविपरीत ॥ सुलक्षणाकुमरेंवधिलीसे ॥ ३९ ॥ तेव्हांअहीमहिदिप्रधान ॥ रायाचेकरतीसमाधा
न ॥ आतांनानाउपायकरून ॥ घातकरुंशत्रूचा ॥ ४० ॥ स्वपुत्राचीऐकतांवाणी ॥ धुम्रवर्णआल्हादोनीमनीं ॥ सभीपउभयासीबाहोनी ॥ कु
रवाळीसुखस्वहस्तें ॥ ४१ ॥ इकडेमाधवसुमदाआनंदभरीत ॥ तान्हियातेंखेळवीत ॥ सद्गुणलीलाअखंडगात ॥ पालखींघालोनीहालवीतां ॥
॥ ४२ ॥ पांचसंवत्सरपर्यंत ॥ उभयतांकौतुकेंखेळवीत ॥ दिनभासेंपळकिंचित ॥ चिंतामणीसीखेळवितां ॥ ४३ ॥ तेव्हांदेवाधिदेवएकदंत ॥
स्वमानसींविचारीत ॥ संपलेंआतांअवतारकृत्य ॥ धुमासुरासीवधोनी ॥ ४४ ॥ राहिलेआतांद्वयदानव ॥ तयांचापुसावयाठाव ॥ केलेंपाहिजे
विंदानअपूर्व ॥ अवतारपूर्णव्हावया ॥ ४५ ॥ सुमदाहालवितांउभीराहून ॥ झालामानसींअभिमान ॥ शोधितांहेंत्रयभुवन ॥ मजसमनसेको
णीही ॥ ४६ ॥ पितामाझाधूमासूर ॥ पराक्रमीजोअतीथोर ॥ जिंकिलेंजयानेंसुरासूर ॥ हरिहरादीसमरंगणीं ॥ ४७ ॥ बंदींघातलेअखीलदेव ॥
आज्ञांकितकेलेंसर्वराव ॥ हारिलासेहासर्वांचागर्व ॥ स्वसामर्थ्यैंकरोनी ॥ ४८ ॥ पित्यानांमाझाकरावयाघात ॥ केलेउपायअत्याद्भुत ॥ तेउ

लटेंकेलेंविपरीत ॥ म्यांस्वपुत्राचेयोगानी ॥४९॥ घुमासुराचीअद्भुतकीर्तिं ॥ द्वारींजयाच्यादेवतीष्ठती ॥ सभेसीयेतांदानवपती ॥ नमीतीपाय
रावज्याचे ॥ ५० ॥ बलाढ्यऐसाजोदानवपती ॥ तयासीवधिलेंम्यांपुत्राहातीं ॥ ऐसीमाझ्यादुधाचीशक्ती ॥ गातीलकिर्तीजगमाझी ॥५१॥
वीरपत्नीअसेमीचएक ॥ त्रयभुवनींनसेकोणीआणिक ॥ पराक्रमकेलाम्यांअलोलीक ॥ किर्तीजगींगावया ॥ ५२ ॥ सुमदागर्वेंजातांभ्रमोनी ॥
हेंजाणोनीचिंतामणी ॥ बोलताझालातयेक्षणीं ॥ पालखींबैसोनीतेसमयीं ॥ ५३ ॥ मातेतुझामीहोवोनिसुत ॥ लीलाकेल्याअत्याद्भुत ॥ पुर्ण
केलामनोरथ ॥ वचनागोविलेंह्मणोनी ॥५४॥ तवपयपानेंम्यांनिश्चित ॥ घुमासूराचाकेलाअंत ॥ दानववधिलेख्यातीवंत ॥ यानेंअवतारच
रितजाहले ॥ ५५ ॥ द्वयअसूरजेराहिलेमहान् ॥ करावयातयांचेंहनन ॥ पुन्हांमीप्रगटहोईन ॥ संकटसमयींयेवोनी ॥ ५६ ॥ वदोनिऐसेंग
जानन ॥ करोनियाहास्यवदन ॥ गुप्तझालानलगतांक्षण ॥ पालखींमाजीखेळतां ॥ ५७ ॥ अदृश्यहोतांविघ्नहर ॥ सुमदाझालीचिंतातुर ॥
करीतसेशोकअपार ॥ दीर्घस्वरेंओरडोनी ॥ ५८ ॥ शोकध्वनीऐकतांकानीं ॥ माधवत्वरेंयेतधांवोनी ॥ तेव्हांसुमदासांगेंगहिंवरोनी ॥ अक्रंदो
नीतेकाळीं॥५९॥ पुर्णब्रह्मजोसनातन ॥ देवाधिदेवगजानन ॥ तोआतांचीमातेंवदोन ॥ स्वानंदभुवनागेलासे ॥६०॥ पालखींखेळतांसकुमार ॥
गुह्यवदलामजसाचार ॥ प्रगटहोईनमीलंबोदर ॥ संकटसमयींरक्षावया ॥ ६१ ॥ वदतांऐसेंतयेक्षणीं ॥ पुन्हागहींवरदाटलामनीं ॥ आठवोनिया
चिंतामणी ॥ करीरुदनतेसमयीं ॥ ६२ ॥ सुमदेचीऐकतांवाणी ॥ माधववदेतयेक्षणीं ॥ गर्वझालातुजलागोनी ॥ ह्मणोनीविपरीतहेंघडलेंसे ॥
॥ ६३ ॥ अभिमानयोगेंहानिश्चिती ॥ दुरावलासेमंगलमुर्ती ॥ विचीत्रझालीदैवगती ॥ पुर्वकर्मानुसारखी ॥ ६४ । कामधेनुयेतांघरीं ॥ प्रा
लब्धेंलावित्बाहेरी ॥ कींकल्पवृक्षअसतांद्वारीं ॥ दृष्टीनपडेकर्मयोगें ॥ ६५ ॥ कींचिंतामणीयेतांहातीं ॥ गारह्मणोनीटाकिलामाती ॥ तेवीझा
लेंआजनिश्चिती ॥ अहंकारेंकरोनी ॥ ६६ ॥ तेव्हांविव्हळझालामाधवमनीं ॥ मोहपावलातयेक्षणीं ॥ अश्रुधारालोटल्यानयनीं ॥ शोककरित
तेसमयीं ॥ ६७ ॥ बालकाचेआठवोनीगुण ॥ दीर्घस्वरेंकरीरुदन ॥ मोहपावलाजनार्दन ॥ अगम्यलीलाजयाची ॥ ६८ ॥ त्रिकाळज्ञानीयोगे
श्वर ॥ प्रगटझालासेसत्वर ॥ माधवेंतेव्हांजोडोनीकर ॥ समाचारसर्वश्रुतकेला ॥ ६९ ॥ जाणोनीउभयांचेंअंतर ॥ वदताझालामुनीश्वर ॥ सोडूं
नकाआतांधीर ॥ अभिमानेंअंतरपडिलासे ।७०।कर्मयोगहाअतीगहन ॥ तोनचुकेभोगिल्याविण ॥ देवदानवमानवसंपुर्ण ॥ दैवयोगातेंभोगिती
॥ ७१ ॥ सुखदुःखादिसमस्त ॥ कर्मयोगेंहोयप्राप्त ॥ दैवयोगेंचीउमाकांत ॥ लिंगपतनासीपावला ॥ ७२ ॥ कर्मयोगेंकरुनीजाण ॥ अपुज्य
झालाकमलासन ॥ दशधाअवतारींजनार्दन ॥ सुखदुःखासीभोगीत ॥ ७३ ॥ प्रथमचारअवतारीं ॥ कुच्छितस्वरुपांपावलाहरी ॥ यांतचतुर्थ॥५

सनातन ॥

हानिरधारी ॥ बिबत्सस्वरुपापावला ॥ ७४ ॥ कर्मयोगेंनसोडिलेंकवणा ॥ भोगीतांजालंधराचीअंगना ॥ दुःखझालेंजनार्दना ॥
चितेसमीपबैसता ॥ ७५ ॥ कर्मचीयोगेंकरुन ॥ क्षयपावलारोहिणीरमण ॥ कर्मयोगेंपाकशासन ॥ भगेंपावलासर्वांगीं ॥ ७६ ॥
दानवपहाकर्मयोगानी ॥ अजिंक्यझालेत्रयभुवनीं ॥ दैवयोगफीरतांक्षणीं ॥ क्षयझालासर्वांचा ॥ ७७ ॥ दैवचीयोगेंकरू
न ॥ क्षत्रियसाधुमुनीगण ॥ सुखदुःखपावलेंसंपूर्ण ॥ सोडिलेंनसेकवणासी ॥ ७८ ॥ तरीअभिमानसर्वत्यजून ॥ सुवि
चारीलावीमन ॥ गुह्यसांगतोंतुजलागुन ॥ चित्तींधरीएकाळीं ॥७९॥ शोककरितांआतांयेथ ॥ बाहेरप्रगटहोईलमात ॥ दानवयेवोनीक
रतीलघात ॥ गोष्टहीबाहेरप्रगटतां ॥ ८० ॥ सुतविरहोतअसेमाधव ॥ असूरपाठवानीदानव ॥ उभयांचात्वरेंघेतीलजीव ॥ बलहीनतुह्मीह्मण
वोनी ॥ ८१ ॥ प्रेमळशब्दवदतांमुनी ॥ माधवस्तब्धझालातयेक्षणीं ॥ साष्टांगेंमुनीतेंनमोनी ॥ स्तुतीकरीसद्भावें ॥८२॥ करोनिउभयांचेंसमा
धान ॥ आश्रमींगेलामुनीभुषण ॥ तेव्हांसुमदामाधवआनंदोन ॥ चित्तींचिंतीतीगजानना ॥ ८३ ॥ लोटतांऐसेकांहींदिवस ॥ हेरसांगतीधुम्र
वर्णास ॥ माधवसुतस्वानंदास ॥ पुसोनीगेलाउभयांसी ॥ ८४ ॥ दुतमुखींचीऐकतांवाणी ॥ असूरआनंदोनीमनीं ॥ ह्मणेमाधवसुमदायेक्षणीं ॥
बलहीनअसती८५आतांरक्षितांनसेउभयांसी ॥ वधावेंजावोनियासमयासी॥ पुढेंअपायनहोयआपणासी ॥अनर्थसमूळचुकेल॥८६॥आतांदानव
धाडोनीबलीवंत ॥ उभयांचात्वरेंकरावाघात ॥ विलंबनकरावाकिंचित ॥ कार्यआधींहेंसाधावें ॥ ८७ ॥ वदतीतेव्हांउभयनंदन ॥ ह्मयासीटा
कीतांवधोन ॥ मगकैंचातयाहोयनंदन ॥ ब्रह्मसनातनपावेळीं ॥ ८८ ॥ सुमदानिमित्यआपणास ॥ नाशहाहोणेंअसेखास ॥ यास्तवनकरितां
अवकाश ॥ दानवशीघ्रपाठवावें ॥ ८९ ॥ अल्पह्मणोनयेअग्र ॥ दग्धकरीलनलगतांक्षण ॥ यास्तवआदौविचारकरून ॥ समूळविध्वंसवानीटाका
वा ॥ ९० ॥ उभयांचीऐकतांवचनोक्ती ॥ धुम्रवर्णआनंदलाचित्तीं ॥ पाचारोनीकाळासूराप्रती ॥ आज्ञापीततयासी ॥ ९१ ॥ स्थावरक्षेत्रासीजा
वोन ॥ उभयांसीयेईआतांवधोन ॥ यानेंसकळांचेंहोईलकल्याण ॥ अनर्थचुकेलअनयासें ॥९२॥ आतांमाधवसुमदासुताविरहित्त ॥ यायोगेंअस
तीबलहत ॥ तरिआतांजावोनियात्वरीत ॥ कार्यसाधीयुक्तीनें ॥ ९३ ॥ वदेतेव्हांकाळासूर ॥ चिंताआतांकरीदुर ॥ साह्यासीआलीयाहरिहर ॥
करिनसंहारसर्वांचा ॥ ९४ ॥ ज्वालासूरआणितृणासुर ॥ तिसराअतुर्बळीवातासुर ॥ हेमजसंगतीदेसाचार ॥ साधीनकार्यासीनिश्चयें ॥ ९५ ॥
आह्मीचौघेहीअतुर्बळी ॥ काळासीघेऊंहाताफळी ॥ उभयांसीवधूंयेवेळीं ॥ स्थावरक्षेत्रींजावोनी ॥ ९६ ॥ गुप्तरुपेंजावोनीतेथ ॥ अवचिताकरुंउ
भयांचाघात ॥ तेव्हांधुम्रवर्णऐकतांमात ॥ हर्षभरितजाहला ॥ ९७ ॥ चौघांसीसमीपबैसवोनी ॥ वस्त्रेंदिधलींबहुमानानीं ॥ गौरवकेलासभास्था

नीं ॥ आज्ञापितमगजावया ॥ ९८ ॥ इकडेमाधवसुमदाआनंदानी ॥ सद्भावेंअर्चितीचिंतामणी ॥ परीपुत्रविरहयोगानी ॥ चिंताग्रस्तसर्वदा
॥ ९९ ॥ कार्तिकशुक्लचतुर्थिसी ॥ आरद्राभृगुवासरासी ॥ अर्चितीप्रेमेंगजमुखासी ॥ षोड्शोपचारेंमाध्यान्हीं ॥१००॥ दुर्वाशमीमंदारसुम
नीं ॥ अर्चोनीभावेंचिंतामणी ॥ मंत्रपुष्पांजलीअर्पोनी ॥ ध्यानकरतीआनंदें ॥ १०१ ॥ ध्यानींनिमग्नताजाणोनी ॥ संतोषलासेमोक्षदानी॥
पुढीलभविष्यजाणोनी ॥ प्रगटहोतसेतेकाळीं ॥ २ ॥ जोदीनदयाळजगदुद्धार ॥ भक्तकैवारीलंबोदर ॥ तोमाध्यान्हींयेतांदिनकर ॥ प्रगटझाला
सेआनंदें ॥ ३ ॥ सुमुखसुंदरएकदंत ॥ सरळशुंडाविराजीत ॥ किरिटकुंडलेंमंडीत ॥ तेजफांकलेंदशदिशां ॥ ४ ॥ पीतपीतांबरआखुवाह
न ॥ नाभींविराजेशेषभूषण ॥ जान्हुजंघातळवेंपूर्ण ॥ बालार्कासमभासती ॥ ५ ॥ ऐसाउभयांसन्मुखएकदंत ॥ प्रगटलापूर्णकरावयाहेत ॥
निमग्नलक्षीतांध्यानांत ॥ वदताझालातेसमर्यीं ॥ ६ ॥ ह्मणेझालोंआतांमीतुमचासुत ॥ ध्यामातेंआतांत्वरीत ॥ संशयनधरावाकिंचित ॥ झा
लोंप्रगटयेकाळीं ॥ ७ ॥ कर्णींऐकतांअमोघवाणी ॥ सावधझालेतयेक्षणीं ॥ लक्षितांनेत्रउघडोनी ॥ गजाननसन्मुखदेखिला ॥ ८ ॥ सुमदा
माधवआनंदोनी ॥ नमितीभावेंतेंव्हांचरणीं ॥ पाणीद्वयजोडोनी ॥ प्रार्थितीउभेराहोनी ॥ ९ ॥ देवाधिशतूंएकदंत ॥ केवींशोभसीआह्मांसीसु
त ॥ [illegible]रीपूर्णकरीआमुचाहेत ॥ लघुरुपातेंधरोनी ॥११०॥ मागतोंदेवाहेंजोडोनीकर ॥ दयाळूतूंमोरेश्वर ॥ ऐकतांकर्णींहेंउत्तर॥ संतोषलासेते
समर्यीं ॥ १११ ॥ सद्भावउभयांचाजाणोनीमनीं ॥ बालकझालामोक्षदानी ॥ सनाळबालतयेक्षणीं ॥ सुमदेनेंलक्षिला ॥ १२ ॥ मायाजयाची
अनिवार ॥ रुदनकरितांमोरेश्वर ॥ उचलीतसेअतीसत्वर ॥ बालकासीआनंदें ॥ १३ ॥ अवतरतांतेंव्हांसर्वेश्वर ॥ पुष्पवृष्टीसकरतीसूर ॥
दुंदुभिनादेंकोंदलेंअंबर ॥ त्रिभुवनसारेंआनंदलें ॥ १४ ॥ पहावयासीचिंतामणी ॥ यतीतापसीआणिमुनी ॥ ओंवाळावयासुवासिनी ॥
येतीआरत्याघेवोनी ॥ १५ ॥ आश्रमींयेतांकौंडण्यमुनी ॥ माधवसद्भावेंनमीतचरणीं ॥ सुवासीनीओंवाळीतीतयेक्षणीं ॥ आनंदें
करोनीउभयांसी ॥१६॥ तेंव्हांमुनीआदिकौंडण्यासी ॥ माधवेंअर्चोनियासर्वांसी ॥ प्रार्थीतसेमुनीसी ॥ सद्गदअंतरींहोवोनी ॥१७॥ जयज
याजीगुरुवर्या ॥ अखंडअसेतुमचीदया ॥ झिजवीलीजरीतवपदींकाया ॥ परीउत्तीर्णनोव्हेंसर्वथा ॥ १८ ॥ तेंव्हांअंतरझालेंसद्गदीत ॥ अश्रु
धारानयनींस्रवत ॥ मुनीतयासीशांतवित ॥ धन्यभाग्यतुझेंहें ॥ १९ ॥ तपतुवांकरोनिथोर ॥ दृश्यकेलाहासर्वेश्वर ॥ तुजसमजगींनिरधार ॥
भाग्यशालीनसेची ॥ १२० ॥ आनंदोनीयामाधव ॥ संगेंघेवोनियाभूदेव ॥ पहावयादेवाधीदेव ॥ जातसेसदनीतेकाळीं ॥ २१ ॥ पूर्णब्रह्मजो
सनातन ॥ मायातीतशुद्धचैतन्य ॥ तयासीमुनीनेंलक्षोन ॥ मोदपावलाअंतरीं ॥ २२ ॥ मुनीवदेमाधवासी ॥ मधुबिंदुलावीमुखासी ॥ माध

वैंसांगकरोनीकर्मासी ॥ मधुबिंदुमुखींलाविला ॥ २३ ॥ गणिकवदतीरायासी ॥ तवसुतहास्वानंदवासी ॥ वधोनियादानवांसी ॥ भक्तांलागी
रक्षील ॥ २४ ॥ लीलाकरीलअत्याद्भुत ॥ सुरासुरांदीकरीलमुक्त ॥ तेव्हांमाधवेंविप्रसमस्त ॥ गौरविलेंआनंदें ॥ २५ ॥ तेव्हांकौंडण्यादीसर्व
मुनी ॥ आनंदोनियाअंतःकरणीं ॥ जातीमाधवासीपुसोनी ॥ आश्रमासीतेकाळीं ॥ २६ ॥ बालकतेव्हांकरितांरुदन ॥ सुमदासमजावीतअं
कींघेऊन ॥ गुप्तहेरेंशब्दकरोनिश्रवण ॥ गजबजोनीधांवती ॥ २७ ॥ मायापुरीसयेवोनीहेर ॥ धुम्रवर्णासीसांगतीसमाचार ॥ सुमदेसीझाला
कुमर ॥ पंचमदिनआजीअसे ॥ २८ ॥ समाचारसांगतांहेर ॥ असूरझालाचिंतातुर ॥ कांहींनसुचेसुविचार ॥ स्तब्धझालासेतेधवां ॥२९॥
कापूंलागलेंसर्वशरीर ॥ अंगींलोटलाघर्मपूर ॥ हेंलक्षोनियादशकंदर ॥ सयाप्रतीवदतसे ॥३०॥ मनींनहोयउद्विग्न ॥ तवकार्यार्थवेचुंप्राण ॥ अ
नंतउपायकरून ॥ घेऊंप्राणशत्रूचा ॥ १३१ ॥ पराक्रमीतूंअतीथोर ॥ तृणवत्जाळसुमदाकुमर ॥ तरीआतांचीगेलेअसूरचार ॥ करतीलसंहा
रतयाचा ॥ ३२ ॥ चौघेहीमहाअतुर्बळी ॥ काळासीघेतीलहातोफळी ॥ शत्रूरगडोनियाकरतळीं ॥ विजयीहोतीलनिश्चयें ॥ ३३ ॥ सचिवा
चीऐकतांवाणी ॥ असुरसौख्यपावलामनीं ॥ इकडेचौघेहीनामकरणी ॥ अस्तमानींपातले ॥३४॥ मिळालेतेथेंनारीनर ॥ माधवउत्सवकरीथो
र ॥तीतापसीयोगेश्वर ॥ स्थावरींयेतीआनंदें ॥३५॥ नामठेवोनीचिंतामणी ॥ पालखींघालोनीगातीगाणीं ॥ तोंकाळासूरतयेस्थानीं ॥ गु
प्तरूपेंपातला ॥ ३६ ॥ चौघेएकत्रमिळोनी ॥ सोहोळाविलोकितीडुरोननयनीं ॥ पालखींबाळकलक्षोनी ॥ भयपावलेंमानसीं ॥ ३७ ॥ चौघे
करतीतेव्हांविचार ॥ आपणासीवदलादशकंदर ॥ सुमदेसनाहींआतांकुमर ॥ तरीअघटीतहेंघडलेंसे ॥ ३८ ॥ पालखींलक्षितांकुमर ॥ अतुर्ब
ळीदिसेथोर ॥ याच्यावधार्थकायविचार ॥ करावाआतांयेकाळीं ॥ ३९ ॥ वदेतेव्हांज्वालासूर ॥ लघुनह्मणावाआतांकुमर ॥ रणींमारिलाधु
मासूर ॥ तेंस्वचित्तींकांनजाणिलें ॥१४०॥ तरीसन्मुखभिडतांसमरींयास ॥ कदांनाटोपेआपणांस ॥ चौघांचाहीहोईलनाश ॥ तरीकपटेंचो
घातकरावा ॥ ४१ ॥ यांतउत्सवयेथेंदाटलाथोर ॥ मिळालेअसंख्यनारीनर ॥ यांचाकरोनीमनींविचार ॥ कार्यसाधावेंयुक्तीनें ॥ ४२ ॥ ता
न्हापालखींघालोनी ॥ सुवासिनीसर्वगातीगाणीं ॥ सुमदाहरिद्राकुंकुमदेवोनी ॥ आदरकरीतसकळांचा ॥ ४३ ॥ ऐशासमयींचौघेअसूर ॥
दृढविचारकरोनीथोर ॥ मायाप्रगटविलीसाचार ॥ क्रोधायमानहोवोनी ॥ ४४ ॥ तृणासुरेंमावकेलीथोर ॥ शुष्कतृणउत्पन्नकेलेंफार ॥ ज्वालासू
रझालावैश्वानर ॥ वातासुरवायुजाहला ॥ ४५ ॥ काळासूरझालाविवर ॥ जयांतसामावेलहेंचराचर ॥ धरणीसमविवरथोर ॥ झालासाचारते
काळीं ॥ ४६ ॥ आश्रमाच्यापूर्वभागीं ॥ भयानकविवरझालावेगीं ॥ मोहितकेलेंसकळांलागी ॥ असूरीमायेच्यायोगानी ॥ ४७ ॥ मुक्तठेवो

नियाविवरद्वार ॥ त्र्यबासुनेंधडकलावैश्वानर ॥ घुंम्रतेव्हांदाटलाथोर ॥ पूर्वभागरक्षोनीं ॥ ४८ ॥ वातसुटलाअत्याद्भुत ॥ ज्वाळादाटल्यान
भोदरांत ॥ त्यांतधुम्रदाटलाअसेबहुत ॥ पशुपक्षीबहुआहळले ॥ ४९ ॥ ज्वाळाथोरदेखतांनयनीं ॥ सुमदामाधवदचकलेमनीं ॥ अकांतकर
तीमुनीभामिनी ॥ वाटनदिसेंपळावया ॥ ५० ॥ झालाएकचीअहंकार ॥ सर्वांचातेणेंखचलाधीर ॥ सुमदामाधवअतीसत्वर ॥ तान्हाघेवो
नीपळताती ॥ ५१ ॥ करतीआक्रोशेंरुदन ॥ घुम्रदाटलाअतीदारुण ॥ अदृश्यकेलारोहिणीरमण ॥ असूरीमायेच्यायोगानी ॥ ५२ ॥ अग्नी
भयेंकरुन ॥ चालतांपडतीउलथोन ॥ दिशानसमजतीपूर्ण ॥ मार्गनदिसेंचालतां ॥ ५३ ॥ तेव्हांसुमदेसहातींधरोनी ॥ माधवचालेचाचपो
नी ॥ घुम्रभरेंनाशिकनयनीं ॥ समस्तांच्यातेसमयीं ॥ ५४ ॥ एकमेकांसीधरोनीहातीं ॥ चालतांउलथोनियापडती ॥ मुखींनाशीकींभरेंमा
ती ॥ वातयोगेंकरोनी ॥ ५५ ॥ तेव्हांकाळासूरमावकरी ॥ वदनींनिर्मिल्यानरनारी ॥ हांकामारितीएकसरी ॥ मार्गअसेयापुढें ॥ ५६ ॥
भीतिसर्वहीत्यजोनी ॥ त्वरेंयावुह्मीयास्थानीं ॥ आह्मींमुक्तझालोंसंकटांतोनी ॥ सुस्थळहेंपावलीया ॥ ५७ ॥ अग्नीभयकदानसेयेथ ॥ वायूधु
म्रनाहींकिंचित् ॥ कृपाळुहोऊनीभगवंत ॥ थोरसंकटींरक्षीलें ॥ ५८ ॥ अभयवचनऐकतांकानीं ॥ समस्तआनंदलेअंतःकरणीं ॥ सुमदामाधव
तयेक्षणीं ॥ मोदपावलेमानसी ॥ ५९ ॥ शब्दध्वनीजिकडोनीयेत ॥ त्यास्थळासीजातीसमस्त ॥ त्यांततमदाटलासेबहुत ॥ मार्ग
नदिसेचालतां ॥ १६० ॥ तेव्हांथोरमारोनियाहांका ॥ बाहतीचालतांएकमेकां ॥ तेव्हांपावलेसर्वहारीखा ॥ विवरद्वारयेतां
ची ॥ ६१ ॥ सुवासयेवांतेव्हांघ्राणीं ॥ विवरींजातीआनंदानी ॥ सुमदामाधवतयेक्षणीं ॥ प्रवेशतीत्वरेंविवरांत ॥ ६२ ॥ पाटींवाहेनिर्मळपा
णी ॥ वृक्षडोलतीफळेंभरोनी ॥ पक्षीवृक्षावरीबैसोनी ॥ शब्दमधुरकरताती ॥ ६३ ॥ सुरम्यनेत्रींलक्षितांस्थळ ॥ माधवमुनीहर्षलेसकळ ॥
लक्षोनियानिर्मळजळ ॥ बैसतेझालेआनंदें ६४ अंकावरीघेवोनीकुमर ॥ कुचींलावितघालोनीपदर ॥ वदतीतेव्हांमुनीश्वर ॥ वाचलोंआजीसुदै
वें ६५ अग्नीमुखींआजीहोतांअंत॥परीदेवहोवोनीदयावंत ॥ रक्षणकेलेंसेनिश्चित ॥ संकटसमयींधांवोनी ६६ वदनींऐसेंवदोनी॥ निवांतबैसलेएके
स्थानीं ॥ तेव्हांदानवक्रोधाउनीमनीं ॥ करीनवलतेघवा॥६७॥ स्वमनींहर्षोनियादानव॥ कर्मकेलेंचीमीआजीअपूर्व ॥ सुमदाकुमरआणिमाधव॥
भक्षीनआतांसर्वांसि ॥ ६८ ॥ वदलोजेंमीधुम्रवर्णासी ॥ तेंसत्यकेलेंसेवचनासी ॥ भक्षीनआतांसर्वांसी ॥ स्वसामर्थ्येंकरोनी ॥
॥ १६९ ॥ ऐसेंवदोनीतयेक्षणीं ॥ रगडूंपाहेंदंतेंवदनीं ॥ हेंजाणोनियामोक्षदानी ॥ करीनवलतेघवां ॥ १७० ॥ सुमदा
नियात्वरीत ॥ मोहितकेलेंसर्वांसी ॥ १७१ ॥ असूराच्यातेव्हांव

मिष्यमात्रेंतेकाळीं ॥ ७२ ॥ तेव्हांलक्षोनियात्रयदानवांसी ॥ परशूघायहाणो
नात्रयासी ॥ द्विखंडकरोनियावेगेंसी ॥ धरणीवरीटाकिले ॥ ७३ ॥ धरणीवरीपडतांअसूर ॥ शवेंपसरलींपर्वताकार ॥ तेव्हांमोहनकाढिलेंसे
सत्वर ॥ गजवदनेंतेकाळीं ॥ ७४ ॥ असूरासीकरितांद्विखंड ॥ ओरडलातेव्हांअतीप्रचंड ॥ डळमळलेंतेणेंब्रह्मांड ॥ माधवमुनीघाबरले ॥
॥ ७५ ॥ विशाळदेखतांअसूरप्रेत ॥ वदनींम्यालेतेव्हांसमस्त ॥ माधवमुनीपळतीत्वरित ॥ जीवभयेंकरोनी ॥ ७६ ॥ सुमदातेव्हांघाबरो
नी ॥ वेगेंधांवेंकुमरघेवोनी ॥ मागेंपुढेंदेखोनीनयनीं ॥ ओरडेंतेव्हांजीवभयें ॥ ७७ ॥ माधवासीवदतीमुनी ॥ असूरवधिलाबाळकानी ॥
सुमदावचनऐकोनी ॥ टीटकाढीतसेतेधवां ॥ ७८ ॥ शिशिरऋतुचेंतेजगहन ॥ प्रकाशलारोहिणीरमण ॥ आश्रमींयेतांमुनीगण ॥ असुरशवा
सींदेखिलें ॥ ७९ ॥ त्रयप्रेतांसीलक्षोनी ॥ सकळभयपावलेंअंतःकरणीं ॥ सुमदामाधवेंहेंलक्षोनी ॥ विस्मयकरतीतेधवां ॥ १८० ॥ बैसलों
असतांदानववदनीं ॥ तयासीवधिलेंतान्हियानी ॥ तरीआतांयात्रयांलागोनी ॥ कोणीवधीलेंयावेळीं ॥ ८१ ॥ स्तवहोतसेरुधीरास ॥ आतांको
णीवधिलेंयास ॥ तेव्हांमुनीवदतीमाधवास ॥ तवसुतेंत्रयांसीमारिलें ॥ ८२ ॥ कडकडाटजेव्हांझालाथोर ॥ तेव्हांचीवधिलेंहेनिशाचर ॥ हेंकां
नजाणसीसाचार ॥ मायाअघटितजयाची ॥ ८३ ॥ सुमदामाधवऐकतांवाणी ॥ मुनीसनमितीआनंदानी ॥ आश्रमींसर्वांसीआणोनी ॥ श
करावाटिलीतेकाळीं ॥ ८४ ॥ मायापुरीसजावोनीहेर ॥ रायासीसांगतीसमाचार ॥ बाळकेंवधिलेंचौघेअसूर ॥ स्वरुपप्रगटनकरितां ॥ ८५ ॥
वचनऐकतांसेवकाचें ॥ खचलेंधैर्यअसुराचें ॥ आतांमरणआलेंसाचें ॥ विचारबरानदिसे ॥ ८६ ॥ अनंतकरितांयासीउपाय ॥ उलटाहोतसे
आपणासअपाय ॥ नदिसेंआतांबरीसोय ॥ तरीकाळफीरलाअसेहा ॥ ८७ ॥ वदतांऐसेंधुम्रवर्ण ॥ तयासीशांतवीदशानन ॥ चौघांनीकर्मकेलें
गहन ॥ सुविचारमनींनकरीतां८८ विसरपाडोनीकरीतेजरी ॥ शत्रूसवधितेतेनिरधारी ॥ तरीविसरपाडोनीयासत्वरी ॥ घातकरूंशत्रूचा ॥८९॥
पराक्रमीआह्मींअसतांपदरीं ॥ स्वबळदाखवूंशत्रूससमरीं ॥ तूंपाठीराखाअसतांशीरीं ॥ शिक्षाकरुंकाळासी ॥१९०॥ रावणाचेंऐकतांवचन ॥
आनंदलेसकळसभाजन ॥ वदतीतेव्हांधन्यधन्य ॥ विचारवंतह्मणोनी ॥ ९१ ॥ इकडेस्थावरक्षेत्रीसुमदासुत ॥ दिवसेंदिवसथोरहोत ॥ सह
चरसंगेंवनांत ॥ लीलाकरोनीखेळत ॥ ९२ ॥ पांचवर्षेंपूर्णभरतां ॥ अंगणींदेखोनीखेळतां ॥ मातातेव्हांउचलोनीघेतां ॥ ओळीघेतसेधरेख
री ॥ ९३ ॥ पल्लवेंपुसोनियाधुळी ॥ मांडीघेतसेतयेवेळीं ॥ टीटकाढोनियाभाळीं ॥ पदमृत्तीकालावीत ॥ ९४ ॥ तेव्हांस्वकरेंडोळेचोळोनी ॥
जांभईदेतसेमोक्षदानी ॥ सुमदानिरखोनीपाहेंवदनीं ॥ तोंअपूर्ववदनींविलोकी ॥ ९५ ॥ अनंतब्रह्मांडासहहरिहर ॥ सूर्यशक्तीपुरंधर ॥ वरुण

कुबेररोहिणीवर ॥ चराचरादेसेंवदनांत ॥ ९६ ॥ तेथेंसुमदाघेवोनीअंकीं ॥ पल्लवघालोनीतान्हाझांकी ॥ जेंजेंअसेत्रयलोकीं ॥ सेंसर्वदाविलेंमु
खांत ॥ ९७ ॥ धुम्रवर्णादिनिशाचर ॥ स्वमुखींदाखवीलंबोदर ॥ वदनींघालीतसेधुमासूर ॥ लीलाऐसीदाखविली ॥ ९८ ॥ नवलनयनींहेंदे
खतांथोर ॥ सुमदाझालीसेभयातुर ॥ वदनींलक्षीतांचराचर ॥ विस्मयाचित्तींपावली ॥ १९९ ॥ सुमदाझालीसेमोहित ॥ अपूर्वलक्षीतांवेधलें
चित्त ॥ पूर्णब्रह्मजोभगवंत ॥ अवलोकितांनलक्षवे ॥२००॥ अनंतस्वरुपेंदेखतांनयनीं ॥ भ्रमीतझालीतेव्हांमनीं ॥ हेंजाणोनीमोक्षदानी ॥ मा
याअवरीतेकाळीं ॥ १ ॥ अंकींएकटालक्षितांतेकाळीं ॥ हर्षलीतेव्हांहृदयकमळीं ॥ हृदयींधरोनीतेवेळीं ॥ चुंबनघेतसेआवडीनें ॥ २ ॥ तेव्हां
सहचरसंगेंजावया ॥ कटीखालींउतरोनिया ॥ जातसेवेगेंखेळावया ॥ अत्यानंदेंतेधवां ॥ ३ ॥ चेंडूघेवोनियास्वकरीं ॥ स्वलीलेंझोंकीततवअंब
रीं ॥ भूतळींयेतांवरच्यावरी ॥ झेलीतकरपसरोनी ॥ ४ ॥ बालकेंपाडिबांलघोरी ॥ चेंडूनेंतयासीमारी ॥ खेळखेळतीनानापरी ॥ विटीदांडू
हुतुतु ॥ ५ ॥ अस्तासीजातांवासरमणी ॥ येतीत्वरेंनिजसदनीं ॥ तेव्हांसुमदाघेतसेउचलोनी ॥ मुखकुरवाळीतान्हियाचें ॥ ६ ॥ मायापुरींधुम्र
वर्ण ॥ मनींझालासेबहुउद्विग्न ॥ धुंम्राक्षासीपाचारून ॥ गुह्यसांगेंअंतरींचें ॥ ७ ॥ ह्मणेपराक्रमीतूंअत्याद्भुत ॥ आतांपूर्णकरीमाझाहेत ॥ माध
वसुमदाआणिसुत ॥ त्रयांचावधकरीआतां ॥ ८ ॥ शिवाचेंतुजवरप्रदान ॥ सुरनरहस्तेंनहोयहनन ॥ शस्त्रास्त्रांदिसंपूर्ण ॥ स्पर्शनकरीशरीरा
सी ॥ ९ ॥ पशूपक्षांदीवनचराहस्तीं ॥ मृत्युनसेतुजकल्पांतीं ॥ तरीशिघ्रजावोनीस्थावरक्षेत्रीं ॥ कार्यसाधीयुक्तीनें ॥ ११० ॥ ऐसेंसभेंतव
दोनीतयाला ॥ वस्त्राभरणींगौरविला ॥ धुम्राक्षमनींआनंदला ॥ वदवांझालागर्जोनी ॥ ११ ॥ रायानकरीआतांचिंता ॥ ब्रह्मांडगोलसर्वजिं
कीनआतां ॥ जावोनीकरीतोंरिपूच्याअंता ॥ सुमदामाधवासमवेत ॥ १२ ॥ धुम्राक्षाचीऐकतांवाणी ॥ धुम्रवर्णहर्षलामनीं ॥ प्रेमानंदेंअलिं
गोनी ॥ आज्ञादेतसेजावया ॥ १३ ॥ आनंदोनियाधुंम्राक्ष ॥ क्रोधेंनिघालावीरदक्ष ॥ कार्यसाधनींठेवोनीलक्ष ॥ स्थावरक्षेत्रींपातला ॥१४॥
गजाननमायाहीअत्याद्भुत ॥ ब्रह्मादिकांकदानलागेअंत ॥ नवलकरीतसेएकदंत ॥ वधावयाअसुरासी ॥ १५ ॥ स्थावरापासोनीदशयोजनेंदू
री ॥ सह्याद्रिपर्वताच्यापाटारीं ॥ श्रेष्ठअसेतीसप्तपुरी ॥ तयेस्थानींयेतीआनंदें ॥ १६ ॥ पंचगंगेचेंकरोनीस्नान ॥ सप्रेमेंअर्चिलापंचवदन ॥
सन्मुखउभेंराहून ॥ स्तवनकरतीशिवाचें ॥ १७ ॥ अहोरात्रकरतीजागर ॥ तोंकर्मभोगओढवलादुस्तर ॥ धुंम्राक्षहोवोनीक्रोधातुर ॥ स्थावर
क्षेत्रींयेतसे ॥ २१८ ॥ तेव्हांनवलकरितसेगजवदन ॥ विप्रवेषतेव्हांअवलंबुन ॥ असुरासन्मुखयेऊन ॥ उभाठाकलातेसमयीं ॥ १९ ॥ न
